
माणूस शनिवार । ३० डिसेंबर ७२ । पन्नास पैसे

# आराधना नाट्यसंघाचे हयवदन



डावीकडून – मणगे (कपिल), राजन सेठ (पद्मिनी), पानसे (देवदत्त)

□ महाराष्ट्र-राज्य-नाट्यस्पर्धेतील प्रादेशिक फेरीचा निर्णय जाहीर झाला. आणि १९६८ ला 'माणूस'च्या नाट्य समीक्षणाला मी दिलेल्या उत्तराची आठवण झाली.

वर्षानुवर्षे पहिला दुसरा क्रमांक मिळविणाऱ्यांनी स्पर्धेतून आपखुषीने निवृत्त व्हावे असे समीक्षकांनी त्यावेळी सुचवले होते.

एक वेळ अशी येईल की त्या दोन्ही अग्रणी संस्थांना बाजूला सारून नवीन स्पर्धक पुढे जाईल. असा आशावाद मी त्यावेळी लिहिलेल्या पत्रातून प्रगट केला होता.

पुण्यातील दोन्ही अग्रगण्य संस्था पूर्ण बळाने रिंगणात उतरल्या असताना एका तिसऱ्याच नवोदित संस्थेने प्रथम क्रमांक मिळवून आघाडी मारली.

ह्यावरून सादर करणाऱ्या आराधना संस्थेचे दुहेरी अभिनंदन.

अनंत ओक

संपादक
श्री. ग. माजगावकर

३० डिसेंबर १९७२

माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा
अंक : तीस

## सप्रेम नमस्कार

▫ श्रीमती लीला प्रधान

नमस्कार. 'माणूस' मधील तुझ्या पत्रात 'स्नेहांकिता' या माझ्या पुस्तकाच्या संक्षिप्त लिखाणातील काही मजकूरावर लिहिताना तू जी विधानं केली आहेस ती खोडण्याकरिता मी हे पत्र लिहित नाही. केवळ ते मी वाचल्याचं तुला समाधान मिळावं म्हणून ही पोच.

माझ्या वाचकांचा जिव्हाळा, सौजन्य आणि बुद्धिवर माझा संपूर्ण विश्वास आहे. आणि शिवाय तू म्हटलंच आहेस की, 'काहींची अधूनमधून दिशाभूल करता येईल. काहींची नेहमी, पण साऱ्यांची सदाच दिशाभूल करता येणार नाही.' मग माझ्यासारख्या क्षुद्र, नालायक आणि खोटारड्या व्यक्तीच्या लिखाणाची तू दखल घेण्याची आवश्यकता नाही.


ती भाईसाहेबांनी (आपले वडील) ज्ञानेश्वरीचा दीर्घकाळ अभ्यास करून त्याचे इंग्रजीमधे भाषांतर केले आणि तू तर त्यांच्या सहवासात आयुष्यभर होतीस. तरीही तुझ्यातला कडवटपणा जाऊ नये ना? असो.

शुभेच्छा.

स्नेहप्रभा प्रधान

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.




# 'मारुती लिमिटेड'!

## सारे कसे स्वच्छ !

ए मेम

भारतातील विरोधी पक्षात (अर्थात उजवे कम्युनिस्ट सोडून) एका बाबतीत नेहमीच एकमत असते; आणि ते म्हणजे इंदिरा गांधींवर टीका करताना ! राजनारायण, जॉर्ज फर्नांडिस, अटलबिहारी वाजपेयी, ज्योतिर्मय बसू ही सर्व निरनिराळ्या विचारसरणीची मंडळी. पण इंदिराजींवर टीका करताना मात्र एकमेकांना मनापासून साथ देतात. बरे, ही टीका सुयोग्य असती तर कुणाची हरकत नसती. पण जेव्हा ही मंडळी बिनबुडाची टीका करतात तेव्हा आम्हाला खूप संताप येतो. आता संजय गांधीच्या छोट्या मोटार प्रकरणाचेच पहा ना. मोटार कंपनीचे नाव सुद्धा किती पारंपारिक आणि भाविक मनाचे द्योतक आहे 'मारुती लिमिटेड !' खरे तर हे प्रकरण सर्व मंडळी विसरूनही गेली होती. पण नुकतीच लोकसभा व राज्यसभा येथे या प्रश्नावर चर्चा झाली, आणि वृत्तपत्रांनी या प्रकरणाला भडक प्रसिद्धीही दिली. पण यात प्रतिमा काळवंडली ती विरोधी नेत्यांचीच ! उगीच लेकाचे टीका करीत असतात. उद्योगमंत्री सुब्रह्मण्यम यांनी या मंडळींची चांगलीच हजेरी घेतली व या प्रकरणात सरकाचे हात कसे स्वच्छ आहेत हेही दाखवून दिले.

काही दिवसांपूर्वी समाजवादी नेते राजनारायण यांची पुण्यात सभा झाली. विषय होता 'सद्यस्थिती !' यात त्यांना 'मारुती लिमिटेड' प्रकरण काढण्याची काही आवश्यकता नव्हती. पण इंदिरा-टीकेचा चान्स सोडला तर ते राजनारायण कसले ? ते बरेच काही बोलले. म्हणे हिटलर जर्मनीचा अनेक वर्षे सर्वेसर्वा होता पण त्याने आपल्या कुठल्याही रिश्तेदाराला मानाच्या जागा दिल्या नाहीत. इंग्लंडच्या माजी पंतप्रधानांची मुलगी म्हणे शिक्षिका होती. आणि वडिल पंतप्रधान झाल्यावरही ती शिक्षिकाच राहिली. शिक्षणमंत्री तर जाऊद्याच पण साधी मुख्याध्यापिकाही होऊ शकली नाही ! आणि भारतात मात्र पंतप्रधान नेहरूंची कन्या पंतप्रधान होते; पंतप्रधान इंदिराजींच्या चिरंजीवांना मोटार कारखान्याचा परवाना मिळतो ! आता या बोलण्याला काही अर्थ आहे का ? राजनारायणरावांनी दिलेल्या दाखल्यावरून एकच गोष्ट कळून येते की, हिटलर प्रभृतींच्या वारसदारांची उच्चपदे विभूषित कर-

ण्याची कुवतच नव्हती. जर तशी ती असती तर तीही आपल्या वडिलांप्रमाण थोर ठरली असती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडींनी नाही का आपले बंधू रॉबर्ट यांची अध्यक्षांचे खास सल्लागार या महत्त्वपूर्ण जागेवर नेमणूक केली? पण त्यांच्यावर अमेरिकत कुणी टीका केली का? पण इथे मात्र इंदिराजींवर टीका होते. या मोटार प्रकरणात त्यांनी संजयला लिफ्ट दिली ती तो आपला मुलगा आहे म्हणून नव्हे, तर एक कर्तबगार भारतीय तरुण म्हणून! आता यावर लोक म्हणतात की भारतात संजय गांधीपेक्षा कर्तबगार कोणी नाही का? या प्रश्नाला उत्तर द्यायचो काही गरज नाही. आणि चिडूनच उत्तर द्यायचे झाल्यास असे म्हणता येईल की इतर तरुण कर्तबगार असले तरी त्यांचे आईवडिल गांधींप्रमाणे कर्तृत्ववान नाहीत! पण जरा अध्यात्मिक दृष्टीकोनातून विचार केल्यास याचे उत्तर मिळेल. समजा संजय गांधी हे नाव धारण करणाऱ्या तरुणाच्या ललाटी हा परवाना मिळण्याचे भाग्य लिहिले असेल तर हा तरुण भारतात कुठेही रहात असला—अगदी पुण्याच्या सदाशिव पेठेतील ब्राह्मणकुटुंबातही, तरीही त्याला हा परवाना मिळाला असताच. आता संजय गांधी हे इंदिराजींचे चिरंजीव आहेत हा निव्वळ योगायोग म्हणावा लागेल. संजय गांधींची मात्र आम्हाला मनापासून कीव येते. बिचाऱ्याला स्वतःचे काही अस्तित्वच नाही! कुठल्याही क्षेत्रात संजयने कर्तबगारी दाखविली तरी इंदीराजींचे चिरंजीव म्हणून त्यांना हे शक्य झाले असेच लोक म्हणणार! आता उद्योगधंद्याचे परवाने वगैरे मिळविण्यासाठी लांड्यालबाड्या कराव्या लागतही असतील. बहुतेकजण करतातच! संजयनेही आपल्या हिकमती लढवून आपला परवाना मिळविला असेल यात गैर काय आहे? आणि मग इंदिराजींचा संबंध यात येतोच कुठे? इंदिरा गांधीवर टीका करताना ही मंडळी, केवळ इंदिराजींवरच अन्याय करीत नसून कर्तबगार भारतीय तरुणांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संजय गांधी या तरुणाचा मानभंग करीत आहेत! ही मोटार जेव्हा तयार होईल तेव्हा ती संपूर्ण भारतीय बनावटीची असेल. कुठलाही परदेशी भाग त्यात असणार नाही. मग अशी ही भारतीय गाडी बनविण्यासाठी काही लाखांची परकीय यंत्रसामुग्री आणल्यास बिघडले कुठे? हा कारखाना गुरगाव येथे उभारला जात आहे. गुरगाव ते दिल्ली संभाषण करण्यासाठी डायरेक्ट कनेक्शनची सोय नेमकी याच वेळी करण्यात आली. हाही खरा योगायोगच, पण विरोधक या विरुद्ध बडबडलेच! भारतात अनेक ठिकाणी अशा संभाषणाची सोय आहे. पण त्या विरुद्ध कोणी काही बोलत नाही.

जॉर्ज फर्नांडिसनी एक नवीनच मुद्दा काढला. म्हणे या छोट्या मोटारीत बसणार कोण? तर ज्यांच्या बायका महिलामंडळात जाऊन चर्चा करतात व जे स्वतः सेक्रेटरीएटसारख्या उच्च

ठिकाणी नोकरी करतात, त्यांच्या कॉन्व्हेंटमध्ये जाणाऱ्या मुलांना नेण्या-आणण्यासाठी ही गाडी आहे! आता या तर्कटाला काय म्हणावे? फर्नांडिस पुढे म्हणतात की या छोट्या मोटारी-ऐवजी ट्रकची निर्मिती करावयास हवी होती एक ट्रक तयार झाला की म्हणे आठजणांच्या पोटापाण्याची सोय होते. फर्नांडिससाहेब, तुम्ही राजकारण सोडून आकडेशास्त्रज्ञाचे काम करा! सदैव पोटापाण्याची चिंता केल्यास माणसाची प्रगती आणि उन्नती होणार कशी? आणि तुम्हाला कुणी सांगितले की संजय गांधी ट्रकचा कारखाना कधी काढणारच नाही म्हणून? पुढे तो ट्रकचीही निर्मिती करेल, आणि त्याने नाही केली तर त्याचा भाऊ करेल! मग तेव्हा मात्र उगीच बोंबलू नका!

परवा लोकसभेत अटल बिहारींनी सूचना केली की या कंपनीचे नाव 'मारूती लिमिटेड' वदलून ते 'करप्शन लिमिटेड' असे ठेवा. आता नावात काय आहे? मारूती लिमिटेड काय किंवा करप्शन लिमिटेड काय, कारभार एकाच प्रकारचा रहाणार – म्हणजे प्रामाणिक व स्वच्छ! करप्शन शब्द घातल्याने खरोखरच लाचलुचपत बोकाळेल असे का अटलजींना म्हणायचे आहे?

या सर्व प्रकरणात इंदिराजी व संजय दोघेही गप्प बसले आहेत. हो, उगीच मूर्खांशी वादविवाद करून कुणाचे भले होणार? त्यांच्यावतीने सुब्रह्मण्यम साहेबांनी विरोधकांना आव्हान दिले आहे. ते म्हणाले की, मी तुम्हाला सर्व फायली पुरवतो, त्या बघा आणि दाखवून द्या, की संजयला काही जास्त सवलती दिल्या आहेत ते! तसं जर सिद्ध झालं तर इंदिराजी प्रायश्चित्त स्वीकारतील!

बोला, आहे कुणाची तयारी हे सिद्ध करण्याची? जाऊ द्या झाले, कावीळ झालेल्या दृष्टीने नेहरू-गांधी घराण्याकडे पहाणाऱ्यांना नेहमीच काहीतरी काळंबेरं दिसणार. याला कुणाचाच इलाज नाही!

□ □ □

# सलामी योजना ग्राहकांसाठी

सलामी योजना ग्राहकांना आतापर्यंत एकूण दहा पुस्तकांपैकी सात पुस्तके देऊन झालेली आहेत. ज्या ग्राहकांनी पुस्तके अद्याप नेलेली नसतील किंवा ज्यांना पोस्टाने मिळालेली नसतील त्यांनी त्वरित संपर्क साधून आपल्या प्रती ताब्यात घ्याव्यात. महिनाभरात हा व्यवहार पूर्ण होईल. मागाहून कोणतीही तक्रार आली तर तिचा विचार करता येणार नाही. कारण त्यावेळी पुस्तके संपलेली असतील.

या योजनेपैकी उरलेल्या तीन पुस्तकांचा शेवटचा हप्ता जानेवारी ७३ मध्ये ग्राहकांना देण्यात येईल. समक्ष घेऊन जाणाऱ्यांनी जानेवारी २० पूर्वी कचेरीच्या वेळात पुस्तके नेण्याची व्यवस्था करावी. येताना संदर्भासाठी पावती आणावी. याच सुमारास थोडे पुढेमागे पोस्टाने पुस्तके पाठविण्याचे कामही हातावेगळे होईल. या सर्व पोस्टग्राहकांनी आपल्याकडे येणारी टपाल–पॅकिंग इत्यादी खर्चाप्रीत्यर्थची व्ही. पी. सोडवून घ्यावयाची आहे.

या शेवटच्या तीन पुस्तकांपैकी एका पुस्तकाबाबत थोडा बदल झालेला आहे. श्री. शरद गोखले यांचे 'प्रभात' हे पुस्तक योजनेप्रमाणे ग्राहकांना द्यावयाचे होते. परंतु अद्याप या पुस्तकाचे हस्तलिखित तयार नाही. त्यासाठी बराच काळ थांबावे लागण्याची शक्यता आहे. असे थांबून, सर्व योजना अपुरी ठेवण्याऐवजी 'प्रभात' एवढ्याच किंमतपृष्ठांचे 'राजहंस' प्रकाशनचे अरूण साधूलिखित 'फिडेल चे आणि क्रांती' हे नवे प्रकाशन ग्राहकांना देऊन या योजनेचा सर्व व्यवहार पूर्ण करावा असे ठरविले आहे. ग्राहकांनी या बदलाची कृपया नोंद घ्यावी.

## रुपया पुस्तक योजना

□ रुपया पुस्तक योजनेपैकीही निम्मीअधिक पुस्तके ग्राहकांना देऊन झालेली आहेत. उरलेली ३१४ पुस्तके डिसेंबर ७२ मध्ये देण्याचा मानस होता. परंतु वीजकपातीमुळे या पुस्तकांच्या छपाईची कामे आता रेंगाळलेली आहेत. त्यामुळे वीजकपात रद्द होईपर्यंत आता निश्चित अशा कालमर्यादेचे आश्वासन देता येत नाही. खुलासे प्रतिखुलासे यात निष्कारण पत्रव्यवहार व वेळ वाया जाऊ नये म्हणून मुद्दाम हाही मुद्दा येथेच स्पष्ट केलेला आहे. ग्राहकांचा गैरसमज होणार नाही अशी आशा आहे.

## वीजकपात

□ वीजकपातीमुळे 'माणूस' अंकाच्या छपाईतही अधुनमधुन थोडी काटकसर करावी लागणार आहे. या अंकातील काटकसर वाचकांच्या सहजच लक्षात यावी. पृष्ठसंख्या कमी करण्यापेक्षा हा मार्ग बरा असे वाटते. आणखी काही मार्ग वाचकांनी सुचवण्यासही हरकत नाही.

व्यवस्थापक, राजहंस प्रकाशन.
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०



पी डी. ए. ने सादर केलेले 'घाशीराम कोतवाल'
चंद्रकांत काळे । श्रीराम रानडे । रवीन्द्र साठे

# पुण्याच्या नाट्यस्पर्धा : हे सारे कशासाठी ?

पुण्याच्या सांस्कृतिक जीवनात काही वार्षिक गोष्टी घडतात. त्यापैकी सरकारी नाट्यस्पर्धा ही एक ! बारावा नाट्य महोत्सव सोमवार (चार डिसेंबर) पासून सुरू झाला.

एकूण दहा संघांनी नाटके सादर केली.

पुण्याच्या सरस्वती नाट्य संघाने रणजीत देसायांच्या 'पांगुळगाडा' नाटकाने स्पर्धेला प्रारंभ केला. लढाईत गोळी लागून पायाने अधू झालेला मेजर, त्याची एक कलंकित अशी बहीण, चित्रकार मित्र, त्या मित्राचा आणि मेजरच्या पत्नीचा अनैतिक संबंध अस-

त्याचा संशय, यावर नाटकाचा डोलारा उभा आहे. तो डोलारा पोकळ आहे. सर्व नाट्य रचना ही भडक-उथळ, परिणामी सपक झालेली आहे. शेवटी नाटक रचणे किंवा बांधणे ही कला असते. त्यासाठी रंगभूमीच्या मर्यादा आणि सामर्थ्य यांची कलात्मक जाण असणे अगत्याचे असते. ती जाण नाटककाराने निर्मिलेल्या आकृतीबंधातून व्यक्त व्हावी लागते. नेमके त्याचबाबतीत रणजीत देसाई अपुरे ठरले. म्हणूनच निवेदनाचे माध्यम असलेली कादंबरी ते जितके यशस्वीरीतीने लिहू शकले, जनमानसापर्यंत पोहोचू शकले, त्याप्रमाणे नाटकाच्यासंवादाच्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ते सामान्यांपर्यंत पोहोचू शकले नाहीत. त्यांच्या आजपर्यंतच्या सर्वच नाटकांबाबत थोड्याफार फरकाने हेच सांगता येईल. (उदा. कांचनमृग, तानसेन, धन अपुरे, हे बंध रेशमाचे)

मुळातच भडक प्रकृती असलेल्या नाटकाला सरस्वती नाट्यसंघाच्या कलाकारांनी आपल्या भडक एकसुरी अभिनयाची जोड दिली. भडक (मेलोड्रामा) नाटकदेखील त्यातले मर्म शोधून परिणामकारकरीत्या सादर करता येते. इष्ट तो परिणाम तात्कालिक स्वरूपात का होईना साधणे शक्य असते. त्यातील प्रसंगांचे, व्यक्तिचित्रांचे भडकरंग, सुभाषितवजा खोटी वाक्ये, काही काव्यमय भाषेचा भाग कलाकाराच्या अभिनय कौशल्याने उभा राहू शकतो. पण तसा या नाटकात उभा राहू शकला नाही मेजर चंद्रशेखर झालेले शांताराम दीक्षित यांना उत्तम देहयष्टी होती, आवाज दमदार होता, पण त्यांचे बोलणे खोटे-कृत्रिम वाटत होते. चित्रकार झालेले विनायक गोडसे आपल्या आंगिक आविर्भावाने प्रेक्षकांचे लक्ष अकारण वेधीत होते. नंदिनी (सौ. विदुला इनामदार), कमल (सौ. माधवी भट) या दोघीही एकसुरी, निर्जीव बोलत होत्या. मुद्राभिनयाच्या बाबतीत तर त्यांचा काहीच संबंध नव्हता. या नाटकाचे दिग्दर्शक होते वसंत लोणकर. वास्तविक ते स्वत: रंगभूमीवर अनेक कामे केलेले, सरावलेले नट आहेत. दिग्दर्शनाचाही त्यांना अनुभव आहे. असे असूनही ठराविक साच्याच्या पलिकडे त्यांचे दिग्दर्शन जाऊ शकले नाही.

दुसऱ्या दिवशी पुण्याच्याच 'रंगश्री' या संस्थेने श्याम फडके लिखित 'अर्ध्याच्या शोधात दोन' हे नाटक सादर केले. या नाटकातील मूळ लेखनसूत्र चांगले आहे. लग्न झाल्यावर काही वर्षांनी पुरुषाला वाटू लागते की आपल्याला बौद्धिक पातळीवर सहकार

---

समीक्षक

प्रा. वि. भा. देशपांडे

---

करणारी मैत्रीण असावी. तो त्या शोधात आपली बुद्धी खर्ची घालतो. त्यासाठी बायकोला माहेरी पाठवण्याचा घाट घालतो. मैत्रीण घरी येते. काही कारणाने बायकोही माहेरी जाण्याचा बेत रद्द करते. त्यातून अनेक गोष्टी घडत जातात. काही ठिकाणी लेखकाने विनोदी लेखन पद्धतीचा नाटचनिर्मितीसाठी आश्रय घेतला आहे, तर काही ठिकाणी फार्सिकल पद्धतीने लेखन केले आहे. तर उरलेला बराचसा भाग निवेदनाचा, चर्चेचा–कंटाळवाणेपणाचा झालेला आहे. श्याम फडके यांनी आतापर्यंत बरेच नाटचलेखन केले आहे. त्यातले 'तीन चोक तेरा', 'काका किशाचा', 'राजा नावाचा गुलाम' हे फार्सिकल–विनोदी स्वरूपाचे नाटचलेखन रंगभूमीवर मान्यवर आहे. रसिकांनी या नाटकांचे उत्स्फूर्त स्वागत केलेले आहे. त्यांच्या नाटचलेखनाची झेप फार मोठी नसली तरी हुकमी अशा हलक्या फुलक्या रंजकतेच्या पातळीवरची निश्चित आहे. असे असूनही 'अर्ध्याच्या शोधात' या नाटकात प्रसंग निर्मितीतून दिलखुलास हसवणारा विनोद ते निर्माण करू शकले नाहीत. फार्समध्ये शक्यतेच्या आणि संभाव्यतेच्या बंधनाचा विचार कधीच नसतो. म्हणूनच लेखकाच्या कल्पकतेला फार मोठे आव्हान आणि आवाहनही असते. क्षणाक्षणाला स्फोटक असे प्रसंग निर्मिणे शक्य असते. ती शक्यता, कल्पनीयता या नाटकात नसल्याने निराशा झाली. नाटकात अनेक ठिकाणी (रमेश-सुषमा-सुरेखा) पात्रे निरनिराळ्या विषयांवर आपली मते प्रकट करीत वेळ घालवतात. गंभीरपणाचा आव आणून निर्जीव जीवनभाष्य करीत असतात. विद्यमान परिस्थितीतील लोकप्रिय गोष्टीवर टीका-टिंगल करतात, शाब्दिक कोटचा करतात. पण हे सारे मूळ नाटच विषयाला–प्रसंगाला सोडून चाललेले असल्याने नाटक कंटाळवाणे होते.

लेखनदृष्टचा कमकुवत असलेले नाटक अगदीच सामान्य कुवतीच्या नट-दिग्दर्शकाच्या हाती पडले. दिग्दर्शक होते श्रीपाद गोखले. 'रंगश्री'च्या एकाही कलाकाराला फार्स किंवा विनोदी नाटकातील संवाद अभिनयाने व्यक्त करण्याची कला अवगत नव्हती. अशा नाटकांना एक विशिष्ट वेग असतो. तो वेग पात्रांच्या बोलण्यातून आणि रंगमंचावरील हालचालीतून व्यक्त व्हावा लागतो. तो वेग प्रेक्षकाला नाटक संपेपर्यंत बांधून ठेवीत असतो. केवळ जलदगतीने बोलून रंगमंचावर इकडेतिकडे स्वैरपणे वावरणे याने काहीच परिणाम साधला जात नाही. (याच संदर्भात श्याम फडके यांच्या दोन चांगल्या नाटचप्रयोगांची आठवण येते. ठाण्याच्या कलाकारांनी सादर केलेला 'तीन चोक तेरा'चा प्रयोग आणि माधव वझे यांनी कलोपासकांच्या कलाकारांना घेऊन सादर केलेला 'राजा नावाचा गुलाम'चा प्रयोग!) चार-दोन जागा सोडल्या तर या नाटकात मनसोक्त हसावेसे वाटले नाही. विनोदी-फार्सिकल स्वरूपाच्या नाटकांना जर हसू आले नाही

तर आपली परिस्थिती फारच चिंताजनक होते. तशी या नाटकाने झाली. नाटककार 'अर्ध्या'च्या शोधात होता तर आम्ही (प्रेक्षक) हास्याच्या शोधात होतो.

संपदा थिएटर्सने सादर केलेले 'अंमलदार', आदर्श नाट्यसंस्था (पुणे) यांचे 'आई तुझी आठवण येते'; आणि जवाहर नाट्यमंडळ (सोलापूर) यांनी सादर केलेले 'अश्वत्थामा' हे तिन्ही नाट्यप्रयोग कमालीचे निराशाजनक — संतापजनक झाले. केवळ प्रेक्षक सहनशील होते, संयमी होते म्हणूनच या नाट्यप्रयोगांना नाटकाची अखेर गाठता आली. अन्यथा परिस्थिती भयानक होती. आपण काय सादर करीत आहोत, याची सुतरामही जाणीव या नाट्यसंघातील नट-दिग्दर्शकांना नव्हती. वेडगळपण आणि वेंधळेपण यातून निर्माण होणारी हास्यास्पदता मनोरंजन करीत होती. (बारामतीमधील 'नाट्यसाधना' संस्थेने सादर केलेला 'अर्ध्याच्या शोधात दोन'चा प्रयोग मी पाहू शकलो नाही. पण तो प्रयोग पहिल्या नाट्यसंवापेक्षा खूपच बरा झाला, असे ऐकिवात आहे.)

## हयवदन

'आराधना' नाट्यसंघाने 'हयवदन' नाटक सादर केले. मूळ नाटक गिरीश कार्नाड यांचे. त्याचे मराठीकरण केले आहे चिं. त्र्यं. खानोलकर यांनी. (याच नाटकाचा थिएटर युनिटने सादर केलेला हिंदी प्रयोग अनेक अर्थांनी मनात ताजा आहे. पण त्यांची तुलना करून या प्रयोगाचे परीक्षण करणे अन्यायाचे होईल.) हिंदी प्रयोगाची तुलना जरी केली नाही तरी दिग्दर्शक भणगे यांच्या डोळ्यासमोर तो प्रयोग सातत्याने होता, हे वारंवार जाणवत होते. कलाकारांच्या ताकदीच्या मानाने नाटकाच्या निवडीची झेप मोठी होती. त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रमही जाणवत होते. पण त्यामुळे प्रयोगाची उंची मात्र वाढत नव्हती. 'हयवदन' नाटकातील मूळचा आशय पोहोचवण्यात हे कलाकार उणे पडले. आवर्जून चांगला उल्लेख करावा लागेल तो भणगे यांचा! त्यांनी आपल्या भूमिकेत दाखवलेली समज त्यांच्या संघात निश्चितच उजवी होती. भालचंद्र पानसे आणि राजन सेठ यांची देवदत्त-पद्मिनी म्हणून निवड सर्वथा चुकीची होती. त्या दोघांचे बोलणे आणि मुद्राभिनय या दोन्ही गोष्टी भूमिकेचा मूळ अर्थ व्यक्त करण्यास समर्थ नव्हत्या. नेपथ्य म्हणून चौथऱ्यांचा केलेला उपयोग अनावश्यक वाटला. स्वप्नाच्या दृश्यासाठी 'गॉझ' वापरण्याची काहीच जरूरी नव्हती. प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीत हे दोन्हीही नाट्यपरिणामाच्या विकासाला कोठेही मदत करू शकले नाहीत. तो एक शेवटी पोरखेळ वाटू लागला.

'भरत नाट्य मंदिर' या संस्थेने गिरीश कर्नाड यांचे 'ययाति' हे नाटक

सादर केले. या नाटकाचा मराठी अनुवाद प्रा. श्री. र. भिडे यांनी केलेला आहे. ययाति-शर्मिष्ठा-देवयानी यांच्या जीवनसंघर्षाची ही कथा. अनेकांना ज्ञात असलेली. संवाद हा या नाटकाचा आत्मा आहे. ते संवाद जितक्या ताकदीने म्हटले जातील, व्यक्त केले जातील तितक्या प्रमाणात नाटकातील मूळ आशयाशी जाण्याची शक्यता अधिक. नेमक्या त्याच गोष्टीत 'भरत'चे कलाकार थिटे पडले. 'ययाति'चे काम करणारे नाथ दिवाण यांनी सर्वात अधिक निराशा केली. त्यांचे बोलणे जड आहे, परिणामशून्य आहे. त्यांच्या ठिकाणी संवाद फेकीतील अचूकता नसल्याने पाठ केलेले शब्द म्हणत जाणे एवढेच कार्य ते करीत होते. (त्याही कार्यात ते चार सहा वेळा अडखळले) तीच परिस्थिती (बोलण्याच्या बाबतीत) 'देवयानी'चे काम केलेल्या सुनंदा मेहेंदळे यांची होती. जमेची बाजू होती (संवाद म्हणण्यातली) जयश्री फडणीस, मोहन जोशी, मंगला गुमास्ते !

'ययाति'चा प्रयोग सामान्य आणि परिणामहीन होण्याचे काहीसे कारण मूळच्या नाट्यवस्तूतील विस्तारपूर्वक संवादरचना, चर्चा हे जसे आहे, तसेच दिग्दर्शकाच्या मनातील गोंधळ हेही आहे. तो गोंधळ होता नेपथ्य, प्रकाश, संवाद-अभिनय पद्धतीबाबतचा ! नाटकाची लेखनप्रकृती किंवा मूड ही भडकस्वरूपाची नाही. पात्रांना दिलेले पोशाख कमालीचे भडक, लक्षवेधी होते. नेपथ्यात चौथऱ्यांच्या साह्याने आसने केली होती. त्यावर लोड वगैरे ठेवून पौराणिक पारंपारिक नाटकाप्रमाणे त्यांचा वापर होता. तर त्याचबरोबर काळ्या-निळ्या कापडांनी बनवलेल्या भिंती, विषयसूचकतेसाठी एकमेकांना छेद देणारे द्विरंगी त्रिकोण, त्यावरील फूल दाखवून लक्ष वेधले होते. ते प्रतीकात्मक होते, असे जर मानले तर सर्वच नेपथ्य तसे हवे होते. 'ययाति'ची आणि देवयानीची शब्द-संवाद बोलण्याची पद्धती पारंपारिक थाटाची होती, तर पुरूराज, स्वर्णलता, शर्मिष्ठा यांची वास्तवतेकडे झुकणारी, खालच्या आवाजातली होती. या दोन आवाजपद्धतींचा संकर नाट्यपरिणाम हरवून बसत होता. प्रकाशांचे रंग दिव्यांच्या साह्याने बदलणे सतत चालू होते. त्याने काय साधले कोण जाणे ? काही वेळा तर पात्रे अंधारातच बोलत होती. कलाकारांचे सीमित अभिनयसामर्थ्य, दिग्दर्शनातील निर्मिती-विचारामागचा गोंधळ, अस्पष्टपणा, तांत्रिक चुका यामुळे हा प्रयोग कंटाळवाणा आणि काही ठिकाणी हास्यास्पद झाला.

## चमत्कृतीपूर्ण घाशीराम

विजय तेंडुलकर यांचे नवे कोरे नाटक 'घाशीराम कोतवाल' पी. डी. ए. ने सादर केले. पेशवाईचा काळ. घाशीराम कोतवालाची सूडबुद्धी, निर्दयता, क्रूरता; नाना फडणवीसांचे विषयलंपटत्व; तत्कालीन ब्राह्मणवृत्ती;

ऱ्या ब्राह्मणांनी घाशीरामाच्या कारकीर्दीचा केलेला शेवट, अशा काही महत्वाच्या गोष्टींच्या आधारावर नाटकाची उभारणी आहे. पण हे नाटक सरळपद्धतीचे नाही. घाशीरामाची कथा नृत्य-संगीत यांच्या आधाराने आकारण्याचा यत्न आहे. मराठी नाटक ज्या दशावतार, लळित, भारूड यांच्या मुशीतून जन्माला आले, त्या पुराणनाट्यपद्धतीतील अनेक घटकांचे संमिश्रण करून नाट्यरसायन करण्याचा घाट तेंडुलकरांनी यामध्ये घातला. एक नवा नाट्यआविष्कार शोधण्याचा यत्न केला. या आविष्कारपद्धतीमुळे मूळचा आशय झाकोळला गेला. क्षीणजीवी झाला. घाशीराम आणि नाना फडणवीस यांच्या व्यक्तिरेखा एकरंगी – एकमुखी – एकदर्शनी झाल्या. कदाचित या व्यक्तींच्या जीवनातील एवढाच रंगदर्शनाचा भाग लेखकाला अभिप्रेतही असेल ! तर मग व्यक्तिरेखांचे श्रेष्ठत्व निश्चितच मान्य होण्यासारखे नाही. नृत्यसंगीताच्या लयीत ही कथा अखेरपर्यंत प्रवास करू शकली नाही. ज्या ठिकाणी भावदर्शन– व्यक्तिचित्रण व्यक्त होण्यासाठी मर्यादा पडू लागल्या, त्या ठिकाणी लेखकाला गद्य संवादाचा आश्रय घ्यावा लागला; आणि नाटकातील व्यक्तिदर्शनाचा स्तरच बदलून गेला. नाट्यपरिणामाच्या दृष्टीने तो विघातक ठरला. नाटकातले पद्यमय संवाद हे प्रास-यमकाधारित असल्याने त्या संवादातील लेखनसौंदर्याला सीमा होती. त्या संवादांना काव्यमयता कोठेच लाभू शकली नाही. एरव्ही तेंडुलकरांच्या नाटकातील गद्य संवादाचे जे प्रत्ययकारी सामर्थ्य आहे, तो अनुभव या पद्यमय संवादातून येऊ शकला नाही. त्यामुळे नाटक वेगळे वाटले, चमत्कृतीपूर्ण वाटले, परंतु नाट्यसंहितेच्या दृष्टीने फार मोठी कलात्मक उंची गाठून निरतिशय आनंद देऊ शकले नाही. नाट्याविष्काराच्या वेगळेपणाच्या मोहातच ते गुंतून पडले. परिणामी मोठ्या व्यक्तिरेखांच्या जीवनातील आशय व्यक्त करण्याचे कलात्मक कार्य हरवून बसले. नाटक नानांचे झाले. घाशीराम नाट्यसंहितेच्या केंद्रबिंदूपासून ढळला. अभिप्रेत नाट्यविषय आणि नाटकाचा 'फॉर्म' भिन्न भिन्न राहिले.

नाट्यसंहितेच्या आविष्काराबद्दलचा मतभेद बाजूला ठेवून, जे आहे ते रंगमंचावर कसे दिसले ? असा जर वेगळा विचार केला तर ते प्रयोगदर्शन प्रत्ययकारी होते, असे प्रामाणिकपणे सांगता येईल. एखादी नाट्यसंहिता वाचून आपल्या डोळ्यासमोर त्याचा प्रयोग नेमका उभा राहीलच असे नाही. ते काम दिग्दर्शक, कलाकार आणि त्यांचे साथीदार करीत असतात. या नाटकाबाबत तेच म्हणता येईल, दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी आपली सारी कलात्मक शक्ती पणाला लावून या नाटकाचे प्रयोगदर्शन प्रभावी केले. या नाटकात तीस चाळीस कलाकार आहेत. एवढी माणसे रंगमंचावर सहजपणे वावरू द्यायची आणि मूळच्या नाट्यप्रसंगातील आशय नेमकेपणाने व्यक्त करायचा



लक्षात राहिलेला 'प्रेषित' । पाळंदे

यासाठी कल्पकता असावी लागते. पात्रांच्या हालचाली – उभे राहणे (काम्पोझिशन) यातून त्या कल्पकतेचा प्रत्यय येत असतो. पटेलांनी इतक्या विविध स्वरुपात ती व्यक्त केलेली होती, की प्रेक्षकाने मंत्रमुग्ध होऊन दाद द्यावी – आणि ती दिली ! या नाट्य उभारणीत नृत्य आणि संगीत प्राणभूत होते कृष्णदेव मुळगुंद यांनी नृत्याची बाजू व्यवस्थित सांभाळली होती. नाटकामध्ये अनेक पात्रांनी लयबद्ध हालचाली करून नृत्याचा अविष्कार करायचा, ही आपल्याला तितकीशी परिचित गोष्ट नाही. सामान्य पात्रांबरोबरच नाना, घाशीराम, ललितागौरी याही पात्रांना नृत्यमय हालचाली होत्या. असा नृत्यमय प्रकार हास्यास्पद होण्याची शक्यता असते. पण नृत्य दिग्दर्शकांनी, पटेलांनी आणि कलाकारांनी कोठेही तसा होऊ दिला नाही. तीच गोष्ट संगीताची. भास्कर चंदावरकर यांनी या नाटकातल्या निर-

निराळ्या संगीतप्रकारांना दिलेल्या चाली ही मराठी नाटकात लक्षणीय भर आहे. नाट्येतिहासात संगीताच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांनी दिलेल्या चाली ऐकणे हा सुखद भाग आहे. स्तवन, भजन, कीर्तन, भारूड, गजल, कवाली, भूपाळी, रागदारी, लावणी, समूह (कोरस) गान, पोवाडा, सूत्रधाराचे पद्यमय निवेदन इत्यादी अनेक संगीत प्रकारांना बांधलेल्या चाली स्वतंत्र होत्या. ताज्या होत्या. नाट्य-विषयातील आशयघनता वाढवणाऱ्या होत्या. या संगीताला रंगभूमीवर साकार केले श्रीराम साठे, आनंद काळे, श्रीराम रानडे आणि समुहाने ! काळे आणि साठे यांचे गाणे स्मरणीय आहे.

मोजक्या वस्तूंच्या द्वारा सूचकपणे नेपथ्याचा वापर होता. प्रकाशयोजने-बद्दल खास लिहिण्यासारखे काही नाही. पण प्रेक्षकांतून सोडलेले दिवे त्रासाचे होते.

अभिनयाच्या दृष्टीने सर्वात अधिक लक्ष वेधले ते नानांचे काम करणाऱ्या मोहन आगाशे यांनी. त्यांचे चालणे-बोलणे-पहाणे नानांच्या व्यक्तिरेखेला अनुरूप होते. त्यांच्या आवाजाचा एकच सूर आहे, एक विशिष्ट धर्म आहे. त्याचा योग्य वापर केला गेला. श्रीराम रानडे (सूत्रधार) हे प्रमाणापेक्षा जास्त ओर-डत होते. स्वतःकडे लक्ष वेधून घेण्या-साठी आटोकाट प्रयत्न करीत होते. तो प्रयत्न नाटकाला घातक आहे. घाशीरामचे काम करणारे टिळेकर यांनी भडक अभिनयाने आपल्या कामातील सत्व घालवून टाकले. इतके भडकपण कशासाठी ? या नाटकातील तमाम स्त्रीवर्ग अभिनयाच्या दृष्टीने सुमार होता. ललितागौरी आहे यापेक्षा निश्चितच सुंदर पाहिजे होती. गुलाबी दिसलीही वाईट आणि नाचलीही ! ब्राह्मणमंडळीमध्ये सारेजण आपापल्या-परीने चोख कामगिरी बजावीत होते. या सर्वांपेक्षा सतत कौतुक वाटत होते दिग्दर्शक जब्बार पटेल यांचे ! त्यांनी एक समर्थ आव्हान पेलले. आपल्या दिग्दर्शन वाटचालीतील प्रवासात एक नवे पीस त्यांना मिळून गेले !

## पाळंदे–भावे

'महाराष्टीय कलोपासक' या पुण्यातील नामवंत नाट्यसंस्थेने चिं. त्र्यं. खानोलकर यांचे 'प्रेषित' हे नवे नाटक सादर केले पाय पांगळे होऊ घातलेला मुलगा. त्याचे आजोबा वारतात. त्या आजोबाचे हुबेहुब सोंग एक कॅन्सरचा पेशंट घेतो. मुलगा त्यांना आजोबा मानतो. त्याचे पाय बरे होतात. जी गोष्ट डॉक्टरी इलाजाने यशाप्रत जाऊ शकली नाही ती एका प्रेषिताने सिद्ध करून दाखवली. विज्ञान आणि श्रद्धा यातील संघर्ष. विज्ञानाच्या चौकटीत न बसू शकणारा हा प्रेषित जीवनाविषयी खूप काही सांगून जातो. त्या प्रेषिताला अलौकिकत्व देताना खानोलकरांनी कोठेही बुवाबाजीचे व्यावसायिक उथळ-स्वरूप दिले नाही. तो संघर्ष भावनांच्या आणि विचारांच्या स्तरावर ठेवला. हॉस्पिटलच्या वास्तूत हे सारे नाटक घडत असल्याने काही प्रसंगी चर्चेचे

पृष्ठ ४९ वर

मनाचा टवटवीतपणा
विचाराचा अस्सलपणा
भाषेचा रोखठोकपणा
कृतीचा निधडेपणा
मनापासून जोपासणारे

# मराठीतील पहिलेच आणि एकमेव तरुण साप्ताहिक

# मनोहर

पाने । २४ । किंमत । फक्त ३० पैसे ।

- पहिला अंक ४ जाने. ७३ रोजी झोकात अवतीर्ण होणार
- वाचकांनी आपल्या प्रतीची आताच निश्चिती करावी
- विक्रेत्यांनी आपली मागणी विनाविलंब नोंदवावी

साप्ताहिक 'मनोहर'
किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकर नगर, पुणे-९.

# हे नेहमीचंच पण थोडंसं वेगळं !

सौ. तारा पंडित

नाट्यमय घटना न घडतील तर ते कलकत्ता शहरच नव्हे! अशा घटना घडत राहणे हे एका परीने जिवंतपणाचेच लक्षण आहे असे म्हणायला हरकत नाही. परवा नुकतीच घडलेली घटना देखील अशीच नाट्यमय. छात्रपरिषदेच्या विद्यार्थ्यांची प्रचंड मिरवणुक निघाली ती खरी निराळयाच उद्देशाने. पण मध्येच उपस्थित झालेला गोंधळ...मारामारी...गोळीबार आरडाओरडा काय होतेय हे न कळल्यामुळे अवाक् झालेली माणसे...नेमका ह्याच वेळी मुख्यमंत्र्यांचा रंगभूमीवर प्रवेश आणि सर्वांचे लक्ष वेधून घेणारे त्यांचे भाषण सारेच कसं नाट्यमय, अनपेक्षित आणि आकस्मिक !

त्याचं असं झालं–

तो शनिवारचा दिवस होता. दुपारची वेळ होती. आठ कलमी मागणीपत्रक राज्यपालांना नेऊन देण्यासाठी छात्रपरिषदेची प्रचंड मिरवणूक निघाली. अकस्मात त्यातील काही विद्यार्थी निराळयाच एका माणसाला पकडून बेदम मारू लागले. कारण त्याने आठ खून पचवले आहेत म्हणतात. पोलिसांनी त्याला विद्यार्थ्यांच्या कचाट्यातून सोडवला नि आपल्या ताब्यात घेतला. त्याला व्हॅनमध्ये कोंबले नि ठाण्याकडे निघाले. थोडे अंतर जात नाही तोच ट्राफिक लाईटचा लाल दिवा लागला. पोलिसव्हॅन अर्थातच थांबली. एवढ्या वेळात ती हूड पोरे तिथपर्यंत येऊन पोचली देखील. पोलिसांना म्हणाली ह्याला आमच्या ताब्यात द्या. चौरस्त्यावर उभा असलेल्या पोलिसाने दुरून ही झोंबाझोंबी पाहिली. त्याला वाटले ही मुले पोलिसव्हॅनवरच हल्ला करताहेत. आपली ड्यूटी अशावेळी काय आहे याचा त्याने क्षणभर विचार केला नि तत्काळ रिव्हॉल्व्हर बाहेर काढला. पाठोपाठ गोळया सुटल्या. पाच माणसे

पृष्ठ ४६ वर

# आ ले पा क

■ 'रणांगण' कर्त्या विश्राम बेडेकरांनी विदर्भ साहित्य संमेलन प्रसंगीच्या अध्यक्षीय भाषणात गंगाधर गाडगीळांच्या 'दुर्दम्य' कादंबरीवर काही टीका केली. तिला, आपल्या नेहमीच्या इंगाधर पद्धतीने उत्तर देताना गाडगीळांनी बेडेकरांना तोंड सांभाळून बोलण्यास सुचवले. त्यासाठी आपल्या आजीचा उपदेश ऐकवला: माझी आजी मला लहानपणी म्हणत असे, अरे हे बघ, बोलण्यासाठी तोंड उघडण्यापूर्वी अंमळ थांबावं, विचार करावा, आणि मग बोलावं.'

गाडगीळांच्या आजीने मला मोठेपणी काय सांगितले ते तुम्हाला ऐकवू काय? ती म्हणाली: अरे हे बघ, या गंगाधरबद्दल बोलण्यासाठी तोंड उघडण्यापूर्वी अंमळ थांबावं, विचार करावा, आणि मग बोलूच नये हे बरं.

■ सचिवालय नव्या मुंबईत हलवावे, अशी सूचना करण्यात आली आहे.

आमच्या मते, जुने सचिवालय नव्या मुंबईत हलवण्यापेक्षा नव्या मुंबईसाठी नवे कोरेकरकरीत सचिवालय निर्माण करणे काटकसरीचे ठरणार आहे.

■ मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष कोरिया यांनी पुढील सूचना केली आहे: मुंबईत पाण्यावर चालणाऱ्या बसगाड्या सुरू कराव्यात.

अहो, त्यासाठी पाणी आणायचे कुठून? त्यापेक्षा कोकाकोलावर चालणाऱ्या बसगाड्या सुरू करणे बरे.

■ महाराष्ट्राच्या शिक्षणखात्याच्या राज्यमंत्री श्रीमती प्रभा राव यांच्या पतिराजांनी सरकारी कामात ढवळाढवळ केली असा आरोप काही विरोधी पक्षीय सदस्यांनी केला.

श्रीमती प्रभा रावांच्या पतिराजांना प्रभारी सेवक का मानता येऊ नये?

■ 'नवशक्ती'चा भटक्या लिहितो: वाचकहो, या शहरातील (म्हणजे मुंबई) अनीतीच्या मागे लागून या भटक्याची छाती फुटायची वेळ आली आहे.

कमाल आहे. आमची छाती तर नीतीच्या मागे लागल्यामुळे कधीच फुटली आहे.

■ पुन्हा भटक्या: शहरातील बहुतेक डान्सिंग स्कूल्स आता बंद पडली आहेत. त्यातील कोणते केव्हा चालू होईल याकडे भटक्या डोळ्यात तेल घालून लक्ष देतो आहे.

हा भटक्या डोळ्यात इतके तेल

घालतो ना, त्यामुळे तेलाचे भाव भडकले आहेत असा आमचा तर्क आहे.

■ प्रभाकर पाध्यांना (दुसऱ्या) एका तज्ञाने सांगितले की सर्व भारतीय भाषात सुमारे चाळीस टक्के शब्द समान आहेत.

आता आम्ही असे सांगतो की चाळीस टक्क्यांपैकी एकूणचाळीस टक्के शब्द शिव्यांचेच आहेत.

■ १० डिसेंबरच्या 'मराठा'च्या अग्रलेखात म्हटले आहे: प्राथमिक शाळेतील मुलांना निबंधासाठी जे ठराविक विषय दिले जातात त्यात 'मी कोण होणार' हा एक विषय असतो. गमतीची गोष्ट म्हणजे हे विषय जसे ठराविक असतात तसे त्यावरील निबंधही ठराविकच असतात. आपण मोठेपणी डॉक्टर, शिक्षक, नट, किंवा फौजदार होणार असेच बहुधा मुले सांगतात.

मराठावाले, अगदी अलीकडच्या मुलांची काही म्हणजे काही माहिती नाही तुम्हाला. परवा एका प्राथमिक शाळेतील मुलांना 'मी कोण होणार ;' असा निबंध दिला तर सगळ्या मुलांनी एकच उत्तर लिहिले म्हणे : मी सखाराम बाईंडर होणार !

■ लौकरच भरवण्यात येणाऱ्या अखिल भारतीय सारस्वत संमेलनातील प्रतिनिधींच्या पात्रतेसंबंधीचे पुढील कलम पाहा. ज्या भगिनींनी आंतरजातीय विवाह केले असतील त्याही दहा रुपये भरून प्रतिनिधी होऊ शकतील. मात्र त्यांच्या पतीस प्रतिनिधी होता येणार नाही.

हे कलम वाचून जे मनात आले ते येथे सांगण्यासारखे नाही.

■ परवा कोठेतरी वाचले : बुद्धी दोन प्रकारची असते. सूचिका पद्धतीची बुद्धी सुईप्रमाणे शिरून त्या त्या विषयाचे मर्मग्रहण करते. याउलट पिपीलिका बुद्धी एखाद्या विषयावर मुंगीप्रमाणे भरभर फिरत राहते व त्या त्या विषयाची वरवरची माहिती गोळा करते.

आम्ही बुद्धीचा तिसरा प्रकार पाहिला आहे. या बुद्धीला ऊर्णनाभिका अथवा जालिका बुद्धी म्हणतात. (ऊर्णनाभी अथवा जालिक म्हणजे कोळी.) ही बुद्धी विषय बाजूला ठेऊन, आपल्याच नाभीतून तंतू काढून त्याचे जाळे विणत बसते.

■ खाडिलकरांच्या 'कीचकवध' नाटकाला ब्रिटीश सरकारने बंदी केली तेव्हा त्यांना कोर्टात जाण्याचा सल्ला देण्यात आला. त्यावर ते म्हणाले : कोर्टात जेवढा वेळ खर्च होईल तेवढ्या वेळात मी नवीन नाटक लिहीन.

आमच्या विजय तेंडुलकरांचे खटले खाडिलकरांपेक्षा वेगळे आहे. 'सखाराम बाईंडर'वर बंदी येताच ते कोर्टात गेले. त्यांनी विचार केला, कोर्टात नवी, वेगळी माणसे भेटतील; आणि अशी माणसे भेटली की आपल्याला नवीन नाटक लिहिता येईल.

■ सर्वस्वी कवितेला वाहिलेल्या एका मराठी मासिकाच्या संपादकांची तक्रार अशी की मराठी नियतकालिकातून कवितेला पुरेशी जागा दिली जात नाही.

पुरेशी जागा कवितेला लागतेच कुठे ?

■ एक बातमी : बंगलोर व अहमदाबाद येथील सरकारी मालकीच्या मॉडर्न बेकऱ्यात जादा असलेले लाखो रुपयांचे पाव शेकडयांनी जाळण्यात येत आहेत.

अग्नीला 'पावक' असे का म्हणतात ते या बातमीमुळे कळले. पुढे असेही मनात आले की पाव ही गोष्ट आमच्या पूर्वजांना चांगली माहीत असावी. □

## जपानी व्यवसायनिष्ठा

इतर काही देशांच्या तुलनेने जपान हे आकाराने टिचभर राष्ट्र आहे. निसर्गही जपानला फारसा अनुकूल नाही. पण या टिचभर राष्ट्रातील बाहुल्यांसारख्या दिसणाऱ्या माणसांची महत्त्वाकांक्षा आकाशीचे तारे सहज हस्तगत करू पाहते. त्यातच जपानी माणसाच्या स्वाभिमानाच्या, आत्मप्रतिष्ठेच्या कल्पना अत्यंत कडव्या आहेत. दुसरे महायुद्ध अजून चालू असेल अशा खात्रीने पॅसिफिक महासागरातील काही एकाकी बेटांवर थोडे जपानी सैनिक आजही दडून राहिले आहेत, याचे आपल्याला आश्चर्य वाटले तरी जपान्यांना ते स्वाभाविकच वाटेल. हाराकिरी ही गोष्ट आपल्याला आततायीपणाची, क्वचित आचरटपणाची वाटेल; पण आपण तडजोड करतो तितक्या सहजपणे अपमानीत जपानी मनुष्य स्वतःच्या उरी सुरा खुपसून मोकळा होईल.

बरे, हाराकिरी करायला जपानी माणसाला काही भव्यदिव्य कारण लागते असे नाही. आता हीच गोष्ट पाहा ना : साबुरी हिरानो नावाचा एक माणूस होता. मोटार चालवणे हा त्याचा पेशा. आयुष्यभर त्याने मोटारच चालवली. पण अशी चालवली की इतक्या दीर्घ कालावधीत मोटारहाकीबाबत छोटीशीसुद्धा चूक त्याच्या हातून कधी झाली नव्हती. महिन्याभरापूर्वी मात्र हिरानोच्या मोटारचा धक्का लागून एक पादचारी थोडासा जखमी झाला. त्याला झालेली दुखपत मामुली होती. –पण हिरानोच्या मनाला आणि व्यवसायनिष्ठेला मात्र मोठीच दुखापत झाली असली पाहिजे. कारण हिरानो घरी गेला आणि त्याने गळफास लावून आत्मघात केला.

हिरानोचे कौतुक वाटो कोणा; मला त्याची भीती वाटली. खरे तर आपल्याहून तो वेगळा असल्यामुळे त्याचा थोडा तिटकाराही वाटला. हिरानोसारखी व्यवसायनिष्ठा ठेवायची म्हटले असते तर सारे आयुष्य गळफास लावून घेण्यातच घालवावे लागले असते; आणि स्वतःच्या गळ्याला फास कसा लावतात ते मला अजिबात ठाऊक नाही ! □ □ □



कु. राजश्री (ठकार) केळकर

बंद दारातून वेल सुरीसारखी घुसली. दारानी जखम उघडी केली. रक्त-वर्णी साडी नेसून दारांत ती उभी होती. रक्त...त्या घराची जखम , वहाती होती. मी अशीच घरं शोधतो. self contained block...त्यामधल्या self contained गृहिणी...आत्ताची ही पण तशीच उभी होती...आणि तियेच काळ थांबला. खूप मोठ्ठा झाला आणि मी तिला न्याहाळीत राहिलो. जणू अनंत काळ...प्रत्येकीच्या बाबतीत हेच होतं!

लाल साडी. कुरळया, तेल न लाव-लेल्या केसाची फुगीर वेणी. भरलेला चेहरा. पिंगट डोळे. डोळयात आश्चर्य, म्हटलं तर आव्हान, ओळख! पण हे डोळे सगळयांकडेच तसेच पहात असा-

वेत ! गॅस आणणाऱ्या माणसाकडे पाहूनसुद्धा ! कारण, मी जरी गॅस आणणारा नाही तरी दिसायला देखणा मुळीच नाही. उंची बुटक्यातच जमा होईल. काळा रंग, जाडगेला असा मी माणूस आहे. वास्तविक घाणेरडाच दिसायचा पण, माझ्या शरीरावर कुठेही केस नसल्यामुळे मी निर्मळ दिसतो असं म्हणतात. माझे डोळे 'रावणा'चे आहेत हे खरं पण, मंदोदरीकडे पहाताना मात्र रामाच्या आणि माझ्या डोळ्यात काहीच फरक नाही. तीच सभ्यता. तोच शांतपणा ! फरक एकढाच की, मी कुठल्याही स्त्रीला मंदोदरी करू शकतो ! माझ्या धंद्यातली ती नीती आहे... माझ्या सगळ्या स्त्रिया गृहिणी असतात. पतिव्रता असतात. पण असंतुष्ट असतात. मी त्यांना सौख्य देतो. मग त्यात बिघडलं कुठं ? बायका कबूल करत नाहीत. मी त्यांना वाईट मार्गाला लावलं म्हणतात. पण त्यांना नक्की सौख्य मिळतं. माझा तो धंदा आहे. त्याला नीती आहे...अनीती केलेली मला खपत नाही...

...तर, ती कुणाकडेही पाहून हसली असती. Still चित्राने एकदम movement सुरू केली. ओठ हलले, हसल्याप्रमाणे. डाव्या हातावर पसरलेला पदर एकदम खांद्यावर गेला. उजव्या हातानी पदर सरसावला गेला. केसावरून तोच हात फिरला, हाताचा तळवा गृहिणीचा आहे हे नजरेत आलं. मी खुश झालो. मला असेच तळवे आवडतात. मऊ मऊ तळव्यात मन गुंतून रहातं...असं मन गुंतणं म्हणजे धंद्याच्या दृष्टीने निव्वळ मूर्खपणाचं !

"कोण पाहिजे ?"

"तुम्हीच..."

"मी ऽ ?" आवाजात आश्चर्य आनंद.

"हो ! म्हणजे त्याचं...मी आत येऊ का ?"

उगीच खोटी कारणं सांगून आत जाणं मला आवडत नाही आत जायला फारसे परिश्रम पडत नाहीत ! आत गेल्यावर बाकीचं उरकायला वेळ लागत नाही.

"हो ऽ या ना आत."

आता ती दारापासून सरकली...मी आत गेलो. अंग चोरून. असंच जावं म्हणजे विश्वास develope होतो. हे धंद्याला अगदी आवश्यक असते.

आत आल्यापासून माझ्या कामाला गती चढते. चढावीच लागते. मी अगदी सहज स्वरात सांगतो, की दार बंद करा. उन्हाची glare सहन होत नाही. तिला पण पटतं. ती हसते ! जरा बावचळतच दार बंद केलं जातं. सहाजिकच आहे ते. परक्या माणसाला आत घेऊन दार बंद करायला कुणी फारसं धजत नाही. पण बाई नवीन दिसत होती. कदाचित् या धंद्यात ती माझ्यापेक्षा जास्त मुरली असेल. नवेपणा दाखविण्याची तिची हातोटी चांगली होती. कदाचित् अगदीच निष्पाप ! माझा स्वभाव पाल्हाळीक नाही. दार बंद करून जागेवर येऊन बसताक्षणी मी तिला सांगून टाकलं,

"मी तुमच्यावर बलात्कार करायला आलो आहे." ती घाबरलीच. घरात आम्ही दोघंच होतो. Block self contained होता. बलात्कार म्हटलं की बायका सहाजिकच घाबरतात. शब्दालाच असं तेज आलंय् आज काल. साहित्यातसुद्धा सतत बलात्कार होत असतात. काही बायकांना आवडतंसुद्धा, बलात्कार केलेलं. आसुसलेल्या असतात तसल्या चोरट्या सुखासाठी. हातांच्या पकडीत नागिणीसारख्या वळवळतात आणि धुत्कार टाकतात सुखाचे. रानटी नवऱ्याचे बलात्कार सहज सहन करतात. पण दुसऱ्या पुरुषांनी दिलेलं सुख नाकबूल करतात, बलात्कार म्हणून ! मी तिला स्पष्ट सांगितलं, तसं "नाही नाही" म्हणाली. पिंगट डोळे विस्फारले. भित्रे झाले. खरं तर बायकांच्या इच्छेविरुद्ध मी काहीच करत नाही. बलात्कार हा शब्द मी माझ्या म्हणण्यातला आशय पट्कन समजण्यासाठी वापरतो !

"हे पहा बाई, शांतपणे माझं ऐका. मी काही आत्ताच बलात्कार करणार नाही, मला तुमच्या घरची परिस्थिती माहीत आहे. तुमचा नवरा म्हणजे कापडी बाहुली आहे हेही मला माहीत आहे. कुठल्याही पुरुषाबरोबर फिरताना तुम्ही त्याच्या गुलामासारख्या हिंडता. आपल्याला एक मालक मिळालाय् याचा तुम्हाला आनंद होत असतो. हेही मी पाहिलं आहे. पण याच्यापुढे तुम्ही जाऊ शकत नाही. लोकांना दाखवायला तुम्ही स्वत: मालक आहात असं दाखवता पण तुम्ही असता गुलाम ! त्याच्यापाशी तुम्ही तुमचं छुपं दु:ख बोलू शकत नाही. पण मला त्या दु:खाची, त्या भुकेची जाणीव आहे. मी तुम्हाला संपूर्ण अन्नोन आहे. सुशिक्षित स्त्रिया वेश्या का होतात ? माझा धंदा आहे, अशा स्त्रिया वेश्या होऊ नयेत म्हणून. मी हा धंदा चालू केला आहे. मी तुम्हाला शारीरिक सुख देईन. म्हणजे तुमची दृष्टी तुमच्या कुटुंबातच राहील. नजर भरकटणार नाही. मी नीतीने हा धंदा चालवतो. समाजावर उपकार करतो." ती सगळं विसरून हसायला लागली. माझ्या धंद्याला ! पण किती सुशिक्षित वेश्या हिंडतात समाजात ? का हिंडतात त्या ही भूक घेऊन ? माझ्या नीतीला हसतात. माझ्यासारख्याच्या तोंडी ही भाषा हास्यास्पद आहे. पण ती खरी आहे. मी समाजाला, स्त्रियांना वाचवण्याचा प्रयत्न करतोय्. त्या पुऱ्या घसरायच्या आत मी त्यांना सांभाळून परत त्यांच्या घरकुलात आणून सोडतो. माझा धंदा आहे हा.तो पण नीतीने केलेला आहे...तुम्ही विचार करा. समाजाला लागलेली ही कीड मी हळुवार हातांनी दूर करायचा प्रयत्न करतो. कीड वाढवत नाही. विचार करा. मी तिला सगळं सांगितलं आणि तिने खरंच विचार केला.

पिंगट डोळे अधीर झाले. बायकांना पटतं फार लौकर यात शंका नाही. ती माझी गिऱ्हाईक झाली...महिन्यातला तिचा दिवस नक्की झाला. एक गृहिणी self contained blockमध्ये सुखी झाली.

.. ...नक्की झालेल्या दिवशीच

तिच्या घरात मला तो दिसला ! तिचा नवरा नाही. 'तो !' नुसता 'तो !'

एवढीच त्याला संज्ञा ! माझ्यापेक्षा देखणा, बळकट, राकट, कुणाही स्त्रीवर खिळणारे रावणाचे डोळे. तिने मला दारातून परत घालवलं. पण मार्ग, रस्ता दाखवल्याबद्दल thanks मानले. नीच, पापी, दुराचारी.

मी खरा होतो. माझा धंदा खरा होता. माझी नीती खरी होती. शप्पथ मी खरा होतो. माझं डोकं फिरायला लागलं. गर्र ... गर्र ... गर्र ... चकरा पाठीमागून चकरा. सगळ्या बायका दात विचकावून हसत होत्या. गोऱ्या, काळ्या, जाड्या. हडळी ! माझ्यावर त्यांनी खरंच बलात्कार केला होता !

.. मग मात्र मी सगळंच विसरून तोंड रंगवून खिडकीत उभा राहू लागलो...धंद्यासाठी...

□ □ □


तूफान
कुर्बानी
आणि
शनवारवाड्यातील शमादान
ब. मो. पुरंदरे
यांच्या
तीन
कथांचा
संग्रह

राजहंस प्रकाशन
किंमत : साडेतीन रुपये

पुस्तके

# आयत्या कविता

मनोहर ओकांच्या 'आयत्या कविता' वाचल्यानंतर पहिली गोष्ट मनात आली ती ही की नवकवितेवर घेण्यात येणारे सर्व आक्षेप या कवितावर हमखास घेता येतील! ज्यामुळे नवकाव्य अनेकांना नकोसे वाटते, ते सर्व विशेष ओकांच्या कवितेत खच्चून भरले आहेत. असंबद्ध शब्द, दुर्बोधता, गद्यसदृश ओळी, अश्लीलता, ग्राम्यता, बीभत्सता वगैरे हे सगळे मलाही जाणवले, पण तरीही ओकांची कविता मला 'नकोशी' वाटली नाही. जशी आहे तशीच ती ठीक आहे, तिच्यात तथ्य आहे, इतकेच नव्हे तर अनेक ठिकाणी ती अतिशय अर्थपूर्ण आहे, असे वाटले. तिचे काही विशेष जाणवले.

ओकांची कविता अतिशय भडक आहे. हा भडकपणा अनेक बाबतीत दिसतो. अगदी प्रथम लक्षात येते ती आलंकारिक रचना. 'आरशातल्या आरशात वारले बेवारशी' या एकओळी कवितेतील 'आर'ची शब्दागणिक पुनरावृत्ती पाहा. (अर्थात् या रचनेत मोरोपंती कृत्रिमता नाही हे तिचे चांगलेपण. मनातील आशय त्याला साजेशा सुरात व्यक्त होत असताना पद्यात्मक टच् देणाऱ्या प्रासादि विशेषांचे अस्तित्व आले तर अशा रचनेला काव्य म्हणायला हरकत नसावी! कवितेतील निरनिराळे शब्द आणि ओळी यांची नादसंगती साधुन, तिला एक लय देऊन रचना ओघवती करणे सर्वच कवींना आवडते. ओकांच्या कवितेत हा गुण ठळकपणे जाणवतो, इतकेच)

हे प्रियतम अंधार माझे
गगनगूढ गांधार
हे गजान्तअंधार माझे संभ्रम
मध्ययुगीन धुवाँधार
फरदार स्पर्श त्यांचे मऊ लवदार
नर्मसुत वहाते प्रवाह माझे
निजधाम गोंजार

अशा अनेक ओळी दाखविता येतील. संग्रहाचे नावही याला अपवाद नाही.

रचनेच्या दुसऱ्या एका अंगानेही हा भडकपणा जाणवतो. कविता एकदा सुरू झाली की तिच्यातील शब्द एकामागोमाग एक असे जबरदस्त वेगाने येत राहतात. उदारणासाठी कुठल्याही चार ओळी घ्या.

> ही वलयांकित किनरेकिनार
>
> दिवेटिव मुंबई
>
> ह्या भूपट्टीवरून कित्येक
>
> महाभागांनी आरोळ ठोकलेली
>
> कित्येक पिढ्यांचे ऱ्हास
>
> आपल्या योनीमार्गात जोपासलेली

अनेकदा सतत क्रियापदेच येतात, किंवा विशेषणे किंवा नामे. काही वेळा अर्थाला किंवा लयीला कलाटणी देणारे शब्द येतात, आणि त्यांच्यामुळेही कवितेला नवी गती येते.

> तुम्ही बना सुरी मी दुधी भोपळा
>
> तुम्ही दगड मी मखमल
>
> तुम्ही रगड मी खटमल
>
> तुम्ही जिथे जाल तिथे मी
>
> वाट करून देईन
>
> तुम्ही याल मी डोळयाआड

आणि या शब्दातून जो आशय व्यक्त होतो, त्याला अनुरूप असाच हा आवेग असतो. ओकांचे शब्द अनेकदा असंबद्ध किंवा दुर्बोध वाटतात, पण त्या शब्दांचा रूढ अर्थ आणि कवितेचा सूर (Tone) हे इतके एकरूप झालेले असतात की एक विशिष्ट मन:स्थिती त्यातून सहजण व्यक्त होते. त्यामुळे हे शब्द उगाचच टूम म्हणून आले आहेत, असे वाटत नाही.—अशा रचनेतून प्रकट होणारा एक भडकपणा आहे, तो म्हणजे वैचारिक भडकपणा. ('भडक माथ्याचा तरुण' या शब्दप्रयोगातील 'भडक'चा अर्थ घेतल्यास हा भडकपणा अधिक चांगल्या रीतीने समजू शकेल!) या कवितातून सतत चीड किंवा वैतागच प्रामुख्याने व्यक्त होत असतो, आणि 'गटारातील घाणीच्या पाण्यावर, केसरं डास मच्छरांची चालणारी, रंव्रंव् रंव्रंव तसे व्यवहार, ह्या झेंडू-भडव्यांचे' 'आखून राखलेले, बर्थ-राईट् रिझर्व बंगले, छानछोकी-छोकरीत ज्यांच्या, माथेरान अबू महा-बळेश्वरी, अल्लद आयुष्य स्मूथ-रनिंग "हे टिन्पाट् देवा, तू माझ्या ठोकरीसमोर येऊ नको'—अशा ओळीतून तो अतिशय तीव्रपणे जाणवतो. आणि ही तीव्रता तुकारामाच्या रचनेसारखीच चावरी आहे फक्त ती सतत एकाच बिंदूभोवती गरगरत राहाते; तुकारामाइतकी आशयाची विविधता तिच्यात नाही.... कसेही असले तरी हा सगळा भडकपणा हा या कवितेचा एक अत्यावश्यक भाग आहे; किंबहुना तिच्यातल्या काव्याइतकेच हे अंग लक्षणीय आहे.

ओकाची कविता अनेकदा स्वत: कवीशीच बांधली गेल्याचे जाणवते. हल्लीची स्फुट कविता बहुधा आत्मनिवेदनात्मकच असते; पण ओकांच्या कवितेत याचेही प्रमाण मोठे आहे. एक

प्रकारे भावाभिव्यक्तीसाठी याचा फार उपयोग होतो आणि त्यामुळे त्यांची कविता अतिशय जिवंत वाटते, हे खरे; पण मुंबईवर शंभर एक ओळी लिहिल्यावर एकदम ते ' मुंबई मुंबई। मी तुझ्यातून फाटका। भणंगासारखा निघून जाईन ' असे लिहितात. या ओळी मुंबईशी जेवढ्या संबंधित आहेत त्यापेक्षा खूपच अधिक त्या कवीशी जखडलेल्या आहेत. कवी स्वतःमध्ये किती गुंतून पडला आहे तेच अशा ठिकाणी दिसते.

व्याकरणाचे नियम झुगारून लिहिलेल्या ओळी अनेकदा अतिशय अर्थपूर्ण उतरल्या आहेत. ' वारयोषितेसारखा कोसळतोय पाऊस. । कोण आपल्या मुलाचा बाप ? शोधण्याकरता— हे लक्षात राहिलेले एक ठिकाण. कोणाला यात उपमान आणि उपमेय यांचा गुंता झाल्यासारखे वाटेल. मला ती विलक्षण परस्परपोषक वाटली.

वैचारिकदृष्ट्या या कवितेत एक उणीव आहे. विशिष्ट समाजव्यवस्थेचा किंवा प्रवृत्तींचा निषेध करीत असलेल्याने कोणत्या तरी ध्येयाचा किंवा व्यवस्थेचा किंवा किमानपक्षी सुखवादाचा पुरस्कार करायला हवा, किंवा निदान तसे सूचन तरी हवे. ओकांच्या कवितेत हे नाही आहे. ते तुकारामाच्या, नारायण सुर्व्यांच्या (आणि भालचंद्र नेमाड्यांच्याही) कवितेत आहे आणि त्यामुळे त्यांची कविता जास्त टिकाऊ आहे.

मध्येच ' एकांताचाही आडोसा नको तोंही एक शृंगार आहे ', ' निसर्ग आपल्या' रूपाने वाढून बाहेर पडून उरतो । आपण गहाळ हवेवर अफूच्या बोंडासारखे बहकतो । अरायव्हल— डिपार्चरच्या पाट्या मागून बदलणारा परमेश्वर । व्हल्गर ' अशा वेगळ्या, उठून दिसणाऱ्या ओळी ओकांच्याही कवितेत आढळतात; पण ते वेगळे बेभान भिरभिरणारे शब्द हेच या कवितांचे मर्मस्थान आहे आणि आपल्या दुर्बोधतेवर, ग्राम्यतेवर मात करील इतके ते शक्तिशाली आहे, स्तिमित करणारे आहे.

—सुनील कर्णिक

**आयत्या कविता**
मनोहर ओक
वाचा प्रकाशन, औरंगाबाद,
मूल्य : चार रुपये



एस. ए. अय्यर
२० नगीन महाल,
वीर नरिमन रोड, मुंबई २०

जबानी तिसरी । हप्ता चौथा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक अशोक शहाणे

पण काही काही वेळा मात्र ते एकटेच निर्णय घ्यायचे. ते पण मी बघितलंय्. अशावेळी ते आपल्या सल्लागारांचा किंवा लष्करी प्रमुखांचा सल्ला न घेताच निर्णय घ्यायचे. मजा अशी की असा एकटयानं निर्णय ते ज्या गोष्टीत घ्यायचे, त्यात सगळी जबाबदारीपण त्यांच्या एकटयावर असायची.

मी एकदोन उदाहरणंच देतो कशी ! नाहीतर तुमचा गैरसमज होऊन बसायचा कदाचित् !

बऱ्याचवेळी त्यांचे लष्करी चिटणीस न् सल्लागार मंडळी त्यांना रणांगणात आघाडीवर जाऊ नका म्हणून सांगायचे. तुम्ही मागंच रहा म्हणायचे. किंवा एखाद्या धोक्याच्या भागात जाऊ द्यायला बिचकायचे.

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

नेताजी त्यांचं मुळीच ऐकायचे नाहीत. ह्या बाबतीत नेताजी भलतेच डिक्टेटर होते !

आणखीएक प्रसंग आठवतोय्.

१९४३ साल. सेप्टेंबर महिना. आम्ही तेव्हा सिंगापुरात होतो. महिन्या-भरापूर्वीच नेताजींनी सरसेनापतिपदाची सूत्रं आपल्या हातात घेतली होती. एक-दिवस सिंगापूरच्या म्युनिसिपल मैदाना-वर जाहीर सभा होती. नेताजी बोल-णार होते. मीपण त्यांच्याबरोबरच गेलो. जाताना गाडीत ते मला म्हणाले —अय्यरसाब, आज सभेत मी एक महत्त्वाची घोषणा करतो ! एक प्रचंड वचन देतो लोकांना !

माझे डोळे कुतूहलानं भरून आले. ते बघून नेताजी म्हणाले—मी त्यांना सांगतो की हे वर्ष उलटायच्या आत आझाद हिंद सरकारचा झेंडा ब्रिटिश भारतात फडकवणं शक्य आहे न् तसा आपण फडकवून दाखवू !

मी चाटच पडलो ! तो होता सेप्टेंबर महिना ! आम्ही होतो सिंगापुरात ! रंगूनला लष्करी कचेरी हलवायची गोष्ट निघाली होती इतकंच ! त्या रंगूनपास्नं ब्रह्मदेशची सरहद्द चिक्कार लांब ! डिसेंबरच्या आत आमचं सैन्य भारताच्या सरहद्दीवर पोचणं शक्यच नाही ! तर मग असं वचन देण्यात काय मतलब ?

अर्थात् हे सगळं माझ्यापेक्षा नेताजीं-नाच जास्ती चांगलं ठाऊक होतं.

तरी मी हरकत घेतली.

नम्रपणानंच म्हणालो—पुरं करता येणार नाही असं खोटं वचन जाहीर सभेत देणं काही योग्य होणार नाही, नेताजी ! हे निव्वळ अशक्य आहे ही गोष्ट माझ्यापेक्षा तुम्हाला जास्ती चांगली ठाऊक आहे !

—पण ह्याच्यामुळं त्यांचा उत्साह काय प्रचंड वाढेल !

—पण त्याच्या नंतरचाही विचार करा ना ! हे वचन काही आपल्याला काहीकेल्या पाळता यायचं नाही. वर्षाच्या अखेरीला सगळं जग हसेल आपल्याला !

—पण एवढं अशक्य असं काय आहे त्यात ?

—हो ! आहेच ! वर्ष संपायला अवघे तीन महिने आहेत !

आता नेताजी हसले.

म्हणाले—तुला तर ठाऊक आहे अय्यर, अस्सल आशावादी माणसाच्या

शब्दकोशात 'अशक्य' असा शब्दच नसतो!

'अशक्य' शब्द आपल्या शब्द-कोशातनं ज्याला पार काढून टाकायचा असेल, तो काही 'आशावादी' नसतो —तो असतो आकाशकुसुमवादी !

पण आता हे नेताजींना कसं काय समजावून सांगू? बऱ्याच अशक्य गोष्टी त्यांनी प्रत्यक्ष करूनच दाखवल्या होत्या. उपासानं दुबळ्या झालेल्या माणसाला झियाउद्दीन–माजोट्ट्याच्या वेड्यावाकड्या वाटेनं जर्मनीला पोचणंपण अशक्यच होतं की! परत पाणबुडीतनं इंग्लंडला वळसा घालून पूर्व–आशियात येऊन ठेपणंपण अशक्यच होतं की! रुद्राक्षाची एक माळ न् गीतेची पॉकेट–एडिशन एवढीच शिदोरी असलेल्या यात्रेकरूनं ब्रिटिश सरकारच्याविरुद्ध एवढ्या प्रचंड संग्रामात गुंतून पडणंदेखील अशक्य कोटीतच पडतंच की! पण ते काहीही असलं तरी ते आत्ता जे वचन देणारा-यत, ते शंभर टक्के अशक्य आहे घडून येणं!

माझा सल्ला काही नेताजींनी ऐकला नाही.

जाहीर सभेत त्यांनी घोषणा केली —हे वर्ष उलटायच्या आत ब्रिटिशांच्या हातून सोडवून घेतलेल्या भारताच्या एकातरी भागात आम्ही तिरंगी झेंडा फडकवू, असं वचन मी तुम्हाला देतो!

हजारो माणसांनी अत्यानंदानं आरोळी ठोकली होती हे वचन ऐकून!

ह्याला अपवाद बहुदा मी एकटाच होतो! मला शरमेनं मेल्यागत झालं!

महाकाळाचं रथचक्र अनिवार गतीन पुढं पुढं जातच होतं!

वर्ष संपायला फक्त चार महिने बाकी होते.

नवीन युग निर्माण करणाऱ्या घटना एकामागोमाग एक घडत होत्या पूर्व–आशियात.

भारतातल्या सगळ्याच बातम्या आम्हाला मिळायच्या. वेगवेगळ्या ठिकाणाहून.

अशी एक बातमी आली. प्रचंड पुरानं मेदिनीपूर जिल्हा वाहून गेलाय्! असंख्य माणसं बेघर झाल्यायत!

बातमी मिळाली की बंगालमधे दुर्भिक्ष न् रोगराई प्रचंड प्रमाणात सुरू झाल्याय्! रस्त्यारस्त्यात उपाशीपोटी मेलेल्या माणसांची प्रेतं पडल्यायत!

टोळक्या-टोळक्यांनी गावातली माणसं घासभर भाताच्या आशेनं, वाटीभर पेजेच्या आशेनं शहरांचा आसरा घेतायत बायकापोरांच्या सकट!

अन्न कुठंच नाही! सुजला-सुफला वंगजननी आज भिकारीण झाल्याय्!

आईनं आपल्या भांडाराची दारं उघडी टाकल्यायत! अन् धान्य लुटलं जातंय्!

भुकेल्या माणसांच्या डोळ्यादेखत लुटारूंचं टोळकं अन्न लुटतंय्! वाघि-णीत लादून पाठवून देतय् वेगवेगळ्या आघाड्यांवर—जिथं घनघोर लढाई चाललेली!

१९४३ साल. २९ ऑगस्टच्या 'यंग इंडिया' साप्ताहिकाच्या अंकात नेताजींनी लेखणीला धार आणली—

"भारतातली माणसं आज भयंकर दुर्भिक्षाच्या तावडीत सापडलेली आहेत. दयाळू ब्रिटिश सरकार कलकत्ता वगैरे मोठाल्या शहरांच्या रस्त्यांवरनं उपासमारीनं मेलेल्या माणसांची प्रेतं हलवायची व्यवस्था तातडीनं करतंय्—असं ब्रिटिश वृत्तसंस्थांचं म्हणणं आहे. आपण आशा बाळगू या की ब्रिटिश सरकारच्या प्रेतं हलवायच्या ह्या तत्परतेबद्दल भारतीय जनता कृतज्ञतेनं सरकारचे आभार मानेल! पण आश्चर्याची गोष्ट अशी का आभार मानण्याइतकीही कृतज्ञता ह्या भारतीयांच्याजवळ नाही. उलट ह्या वाढत्या भूकबळींना परकीय सरकारच जबाबदार आहे असं ते म्हणतायत! ह्या दुर्भिक्षाला सरकारच अन्नधोरणच जबाबदार आहे, असा त्यांचा आरोप आहे. भारतात पिकलेलं धान्य ब्रिटिश न् अमेरिकन सैन्याला रसद म्हणून सरकार मध्यपूर्वेत, इराण-इराक वगैरे रणांगणात पाठवून देतंय्. त्याचमुळं भारतात हे दुर्भिक्ष आलेलं आहे--असा त्यांचा अजब आरोप आहे.

'अर्थात् अलीकडे ब्रिटिश भारताच्या अन्नखात्यानं नाना युक्तिवाद न् आकडे देऊन त्या आरोपाचा सपशेल इन्कार केलेला आहे! त्यांचं म्हणणं आहे--पाच लाख टन गहू न् एक लाख चव्वेचाळीस हजार टन तांदूळ एवढ्याशा धान्यात सबंध सैन्याची वर्षभराची बेगमी होते. अन् हे धान्य भारतात उत्पन्न होणाऱ्या एकूण धान्याच्या मानानं अगदीच तुच्छ आहे!

'ते खरंच बोलतायत असं आपण धरून चालू या. भारतात पिकलेल्या धान्यापैकी फक्त पाच लाख टन गहू न् दीड लाख टन तांदूळ एवढंच धान्य ते उपाशीपोटी माणसांच्या तोंडच्या घासांतनं छिनून घेतायत! पण ह्या अधिकार तरी ह्या सरकारला दिला कुणी? आशियातल्या लोकांना कायम आपल्या पायतळी ठेवण्याकरता इंग्लंड-अमेरिकेनं जी लढाई चालवलेली आहे, तर त्या लढाईकरता भारतातल्या करोडो माणसांनी काय म्हणून उपासमार सहन करावी? महात्मा गांधीसकट तीन लाख भारतीय देशभक्तांना तुरुंगात डांबून ठेवल्यावर आता भारत काही ह्याला विरोध करू शकणार नाही, अशी का त्यांची कल्पना आहे?

'ब्रिटिश सरकारच्याच म्हणण्याप्रमाणं भारतात सध्या पाच कोटी टनज धान्य पैदा होतं. अन् भारताची गरज मात्र पाच कोटी वीस लाख टनाच्या घरातली आहे. म्हंजे ब्रिटिश सरकारच्या स्वतःच्याच हिशेबाप्रमाणं भारतात वीसेक लाख टन धान्याचा तुटवडा आहे. तेव्हा ही तूट भरून काढण्याऐवजी उपासमारीनं जर्जर झालेल्यांच्या तोंडचा घास जे काढून घेतात, त्यांना शासक म्हणावं का शोषक?'

ह्यावेळी नेताजी अत्यंत खिन्न होऊन गेले होते. भारत भयानक दुष्काळाच्या तोंडी सापडला होता. अन् नेताजी भारतापासनं हजारो मैल लांब अडकून पडलेले. काहीही मदत करणं अशक्य. वांझोटया रागानं ते तडफडत होते.

शेवटी त्यांनी गव्हर्नर-जनरल लॉर्ड




आर्थिक गुंतवणुकीसंबंधी गांभीर्याने विचार करणारे बव्हंशी लोक, भांडवलाची, सुरक्षितता, अधिक आर्थिक लाभ व सुलभ वटवणूक याकडेच मुख्यत: लक्ष्य देतात.

युनिट्स्पासूनया सर्व गोष्टी मिळतात, शिवाय करामध्येहि सवलत मिळते, हें तुम्हांला माहित आहेच. युनिट्स् वर्षातून केव्हाहि खरेदी केले तरी ते लाभदायकच ठरतात.

**युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया**

davp 72/436

वेव्हेलकडे एक प्रस्ताव पाठवला—ब्रिटिश-भारत सरकारला एक लाख टन तांदूळ भेट म्हणून देण्याची इंडिया इंडिपेंडन्स लीगची इच्छा आहे. ह्याला अटी दोन—पहिली अट, जे जहाज धान्य उतरवायला भारताच्या बंदराला लागेल, त्याला सुरक्षित परत येऊ दिलं पाह्यजे. दुसरं हे धान्य लष्करी मंडळींकरता नाही. ते मुलकी लोकातच वाटलं गेलं पाह्यजे.

भारत-शोषक लॉर्ड वेव्हेलनं त्या प्रस्तावाला काहीच उत्तर दिलं नाही.

तरी शत्रुपक्षाच्या सेनापतीला भेट पाठवायचा हा उपेक्षित प्रस्ताव सबंध जगाच्या इतिहासात विरळा गणला जाईल ह्यात शंकाच नाही! महाकाळाच्या चोपडीत त्याची नोंद राहील!

सेप्टेंबरची सव्वीस तारीख. रविवार. भारताचा शेवटचा सम्राट् बहाद्दूरशहाला श्रद्धांजली वाहण्याकरता नेताजी गेले होते.

तैमुरलंगच्या वंशातला शेवटचा स्वतंत्र सम्राट् महंमद बहाद्दूरशहा. परदेशी राज्यकर्त्यांच्याविरुद्ध त्यानं हातात तलवार घेतली होती. दिल्लीच्या प्रख्यात लालकिल्ल्यात त्याच्यावर खटला चालला न् त्याला दोषी ठरवण्यात आलं. बहाद्दूरशहाला उरलेलं आयुष्य पूर्व-आशियात कैदी म्हणून कंठावं लागलं. इथंच शेवटचा श्वास सोडला त्यानं.

त्याच्या समाधीला फुलं वाहून नेताजी म्हणाले—तुम्ही सुरू करून दिलेलं काम आम्ही हातात घेतलंय्. तुम्ही स्वर्गातनं आम्हाला आशीर्वाद द्या.

नेताजींच्या डोळयात पाणी तरळत होतं.

बहादूरशहाची शेवटची इच्छा नेताजींनी त्याच्याच शब्दात सांगितली—

गाजियों मे बू रहेगी
जब तलक ईमान की।
तब तो लंडन तक चलेगी
तेग हिंदूस्तान की॥

सप्टेंबर गेला. अजुनी दिल्ली दूर अस्त्!

एकवीस ऑक्टोबरला हंगामी आझाद हिंद सरकार बनवल्याची घोषणा झाली.

दुसऱ्या दिवशी—म्हंजे बासवी ऑक्टोबरला—झाशीच्या राणीच्य नावानं लक्ष्मी ब्रिगेड जन्माला आलं.

वर्ष उलटायला आता अवघे दोन महिने बाकी होते!

आठवड्याभरानं आम्हाला बरोबर घेऊन नेताजी टोकिओच्या संमेलनाकरता गेले.

अंदमान न् निकोबार बेटं आमच्या हातात सोपवायचा ठराव सहा नोव्हेंबरला पास झाला. अजुनी आमचं सैन्य युद्धयात्रेला निघालंच नव्हतं. अजुनी आमचं हेडक्वार्टर्स सिंगापूरलाच होतं. नेताजींच्या प्रतिज्ञापूर्तीला आता फक्त एक महिना उरला होता!

सरतेशेवटी डिसेंबरच्या तीस तारखेला नेताजींनी अंदमान बेटावर पाऊल ठेवलं. नाही, अंदमान नाही, 'शहीद' बेटावर! प्रचंड जेल फिरून फिरून पाह्यला. ह्या कुप्रसिद्ध जेलमध्ये असताना ज्यांनी शेवटचा श्वास सोडला

होता, इथं असतानाच जे वेडे होऊन गेले होते, त्यांच्या स्मृतीला नेताजींनी श्रद्धेनं नम्र होऊन नमस्कार केला.

वर्षाच्या शेवटच्या दिवशीच्या शेवटच्या सूर्योदयाबरोबर नेताजींनी त्या तुरुंगावर आपल्या हातानं तिरंगी झेंडा फडकावला.

नेताजी बरोबरच बोलले होते हे शाबित होऊन गेलं. त्यांच्या शब्दकोशात अशक्य हा शब्द खरोखरीच नव्हता !

तर मी काय सांगत होतो ?

हा, सेप्टेंबरच्या त्या सभेत असं वचन सरसेनापतींनी, राष्ट्रपतींनी देणं योग्य आहे का नाही, ही गोष्ट काही त्यांनी कॅबिनेटसमोर पेश करून आवाजी मतदानानं पास करून-बिरून घेतली नव्हती. तसं जर त्यांनी केलं असतं, तर ते सी-इन-सी झाले असते, आझाद हिंद सरकारचे राष्ट्रपती झाले असते--पण आमचे नेताजी नसते झाले !

शेवटच्या चार दिवसांची गोष्ट सांगतो तुम्हाला. पंधरा ऑगस्टपास्नं अठरा ऑगस्टपर्यंतची. आम्ही तेव्हा परत सिंगापुरातच होतो. युद्ध संपून गेलं होतं. नेताजी पायीपायी आले होते रंगूनहून बँकॉकवरनं परत सिंगापूरला. जपाननं शरणागति पत्करली होती.

आदल्या संध्याकाळी नेताजी आजारी असूनदेखील एक समारंभाला गेले होते. दाराशी येऊन ठेपलेल्या भयानक दुर्दैवाची उपेक्षा करून राणीवाहिनीच्या मुलींनी एक नाटक बसवलं होतं.

दुसऱ्या दिवशी पंधरा ऑगस्ट. सकाळची वेळ. भारत स्वतंत्र व्हायच्या बरोबर दोन वर्षं आधीची गोष्ट सांगतोय् मी.

आदल्या रात्री कर्नल स्ट्रॅची न् कॅप्टन मल्लिकला बोलवणं पाठवलं होतं नेताजींनी. सकाळीसकाळीच ते आले. बरोबर बरेच प्लॅन्स न् मॉडेल्स. नेताजी बसले होते बंगल्याच्या त्या प्रशस्त व्हरांड्यात--जिथं बसून दोन वर्षामागं इंग्लंड-अमेरिकेविरूद्ध युद्ध पुकारण्याचा निर्णय आम्ही घेतला होता.

सॅल्यूट करून स्ट्रॅची न् मल्लिक नेताजींच्या समोर उभे राह्यले. नेताजींनी सांगितलं तशी एका लांबलचक टेबलावर पाच-सात मॉडेल्स मांडून ठेवली. शहीद-मिनाराची डिझाइन्स.

नेताजींच्या मनात तेव्हा काय वादळ उठलं असेल त्याची सहजच कल्पना करता येण्याजोगी आहे. त्यांच्या आवाहनाला साद देऊन परदेशात स्थायिक झालेली असंख्य भारतीय माणसं आपल्या बायकापोरांची-कुटुंबाची गोष्ट विसरून वळवाच्या वादळासारखी धावली होती भारताच्या दिशेनं. गटागटानं त्यांनी आपल्या काळजाच्या रक्तानं स्वातंत्र्यलक्ष्मीच्या पायांचं प्रक्षालन केलं होतं ! नेताजींना ठाऊक होतं, ह्यांचं आत्मदान काही फुकट गेलेलं नाही, फुकट जायचं नाही ! भारताचा कब्जा काही त्यांना मिळवता आला नव्हता. पण जगाच्या न्यायालयात त्यांनी शाबित करून टाकला होता स्वातंत्र्येच्छु भारत-

वासीयांचा नैतिक विजय !

इंग्रज म्हंजे वाण्याची जात, हे ठाऊक होतं नेताजींना. लढाई संपल्यावर आता हे वाणगट चोपडी उघडून जमाखर्च करीत बसतील. लौकरच त्यांच्या लक्षात येईल की ह्या धंद्यात जमेपेक्षा खर्चाचा आकडाच मोठ्ठा आहे. भारत जर असाच मुठीत ठेवायचा असेल, तर मग आझाद हिंद सेनेच्या हजारो रक्तबीजांच्या ह्या वंशजांचं काय करायचं ? हे काही मूठभर क्रांतिकारक नाहीत की त्यांना जेलमधे डांबलं किंवा फासावर लटकावलं की झालं ! हे तर पुरतं सैन्य आहे ! ह्यांना तर भारतात येऊ द्यावंच लागेल! लढाईच्या धामधुमीत ह्या नंबर एकच्या शत्रूची कीर्ती दाबून ठेवता आली होती. पण आता कसाकाय निभाव लागणार?

तेव्हा नाइलाजानं धंदा गुंडाळावा लागेल वाणगट इंग्रजांना. भारताला स्वातंत्र्य देऊन टाकावं लागेल ! नान्य: पन्था विद्यते अयनाय !

तेव्हा नेताजींना पक्कं उमगलं होतं की आपली काही हार झालेली नाही. आपला शेवटचा उद्देश सफळच झालाय्! ठरलेल्या मुक्कामावर आपल्याला पोचता आलंय् ! ह्या वाटेनं नसू दे--त्या वाटेनं ! त्याच्यामुळंच शेवटच्या संदेशात ते म्हणाले--तुमचं रक्तदान काही व्यर्थ गेलेलं नाही ! भारत स्वतंत्र होईलच ! अन् तोही लौकरच !

पण ते काही आता परत यायचे नाहीत ! ज्यांनी तुमच्या-आमच्या स्वातंत्र्याकरता आपलं सर्वस्व वेचलं, त्यांना काय आपण विसरून जाणार ? नाही ! 'तसं होऊ शकत नाही ! त्या मृत्युंजयी शहीदांना आम्ही विसरलेलो नाही ! विसरणार नाही ! विसरू शकत नाही !

एवढ्याचकरता सिंगापूर सोडून जायच्या आधी त्यांनी बोलवून घेतलं होतं कर्नल स्ट्रॅचींना.

अनोळखी, निनावी, अप्रसिद्ध अशा हजारो आझाद हिंद सेनेच्या शहीदांची आठवण म्हणून एक शहीद-स्तंभ बांधायला हवा. सिंगापूरच्या समुद्रकिनाऱ्यावर तो स्तंभ कुठं उभा करायचा ते नेताजींनी स्वत:च ठरवलेलं होतं. दीडच महिन्यापूर्वी--दोन जुलैला--त्यांनी आपल्या हातांनी त्याची कोनशिला बसवली होती. आता वेळ फार थोडा होता. काम पुरं करता येईलच असंदेखील सांगता येत नव्हतं. जपान अधिकृतपणानं शरण गेलं होतं. ब्रिटिशांचं सैन्य कदाचित् पंधराएक दिवसातच सिंगापुरात प्रवेश करेल. त्याच्या आत ह्या स्मारकाचं काम पुरं करता आलं नाही, तर मग ब्रिटिशांच्या कब्जात गेलेल्या मलायात हा स्मारकस्तंभ उभारणं काही शक्यच नव्हतं. पण ब्रिटिश सैन्य यायच्याआधीच जर स्मारक उभारून झालं, तर विजयी इंग्रजांनाही ते मानावंच लागेल. कारण सुसंस्कृत जगाचा रिवाजच आहे तसा. निव्वळ आंतरराष्ट्रीय कायदा आहे म्हणून नाही, आंतरराष्ट्रीय सौजन्याचंपण असं म्हणणं आहे की, जिंकलेल्या देशाच्या शहीदमिनाराचा अवमान करणं हे शिष्टाचाराच्या विरुद्ध आहे. कुणाच्या


# कुटुंब कल्याण नियोजन केंद्राला आता भेट द्यायलाच हवी. येतांना पत्नीलाहि घेऊन या

कुटुंब नियोजन केंद्रांत आम्ही तुमच्याकडून सर्व कांही ऐकायला तयार आहोंत, तुमच्या व्यक्तिगत समस्या ऐकून घेणें, सूचना करणें हें आमचें कामच आहे. या सूचनांमुळे तुमच्या व्यक्तिगत आयुष्यांत तर मदत होईलच, परंतु तुमचें जीवनहि अधिक सुखी होईल.

अगदी मोकळेपणाने बोला. खुद्द मित्रांना देखील जे प्रश्न विचारायला अनमान करतां तेहि खुशाल विचारा.

पत्नीला घेऊन येणें केव्हांहि योग्यच. तिलाहि महिला डॉक्टरांबरोबर बोलूं द्या. कदाचित् कांही प्रश्न तुम्हांला विचारणें तिला अवघड वाटत असेल. ते ती स्त्री-डॉक्टरांना विचारूं शकेल व माहितीहि करून घेईल. घरीं याल तेव्हां तुम्हांला तुमचें वैवाहिक जीवन अधिक सुखी झाल्याचें आढळून येईल कारण-

**आता तुमची जोडीदारीण सुजाण झाली आहे**



कवटीला लाथ मारायची नाही !

सौजन्याचा हा कायदा माहीत होता आय-सी-एस सुभाषचंद्रांना न् इजिनियर स्ट्रॅचींना.

एकामागोमाग एका मॉडेलची पारख करत गेले नेताजी. मग एकदम थबकले एका मॉडेलसमोर. अगदी साधं, भपका-बिपका नसलेलं डिझाइन. जमिनीतनं वर येऊन सरळ उभा राहृयलाय् एक स्तंभ. तीन डोक्यांचा. काही सजावट नाही, काही स्लोगन नाही. एकेका हातावर फक्त एकेक शब्द खोदलेला-- इत्तफाक, इतमद न् कुरबानी !

कोणत्याही देशाच्या, कोणत्याही काळातल्या, कोणत्याही जमातीच्या शहीद मिनारावर सहज असू शकतील असे तीन शब्द ! शत्रूबद्दल काही द्वेष नाही, प्रतिपक्षाबद्दल काही विखार नाही. युगानुयुगं स्वातंत्र्याकरता जमिनी-वर अखेरची लोळणं घ्यायच्या आधी कोणत्याही देशाच्या माणसाच्या जिभेवर हेच तीन शब्द असतात. स्वातंत्र्येच्छु विश्व-सैनिकाच्या तीन किंकाळ्या-- एकता, सतता, आत्मदान ! इत्तफाक, इतमद, कुरबानी !

इंजिनियरकडे वळून सरसेनापती म्हणाले--कर्नल, ब्रिटिश सैन्य इथं उतरायच्या आतच ह्या मॉडेलप्रमाणं एक शहीद मिनार सिंगापूरच्या समुद्र किनाऱ्यावर तयार करावा अशी माझी इच्छा आहे. ती पुरी करणं आपल्याला शक्य आहे का ?

सॅल्यूट करून कर्नल स्ट्रॅची म्हणाले अर्थात् शक्य आहे सर !

आपण काय भलतीच प्रतिज्ञा करून बसतोय् ह्याची जाणीव कर्नल स्ट्रॅचींना होती. हा प्रचंड स्तंभ तयार करायला किमान दोन ते तीन आठवडे वेळ लागेल. अन् शत्रूचं सैन्य सिंगापूरमध्ये कधी उतरेल ते त्यांना काहीच माहित नव्हतं. त्यांच्या सहकाऱ्यांना पण माहित नव्हतं ते आले रे आले की काम अपुरं ठेवूनच शरण जावं लागेल. सध्याच्या परिस्थितीत कामाकरता गवंडी--मजूर मिळणंपण भलतंच कठीण. सगळेच पळून जातायत.

तरी हा सैनिक एका दमात म्हणाला तुम्ही काही काळजी करू नका. मी हे काम पुरं करीनच ! वचन देतो मी !

नेताजींनी कर्नलचा हात जरा दाबला. ते म्हणाले--मला माहित आहे, तुम्ही हे कराल !

नेताजींनी हात सोडल्याबरोबर कर्नल स्ट्रॅची ताठ उभे राह्यले. बुटांच्या नालांचा क्लिक् करून आवाज झाला. सॅल्यूट केला त्यांनी नेताजींना अन् नेताजींनी त्यांना--जयहिंद !

कर्नल स्ट्रॅची तावडतोब निघाले. लगेच कामाला लागलं पाह्यजे. आता एक मिनिटपण वाया घालवून चालण्या-जोगं नाही.

अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली कर्नल स्ट्रॅची, कॅप्टन मल्लिक अन् त्यांच्या सोबत्यांनी ! ब्रिटिश सैन्य सिंगापुरात उत-रायच्या आतच त्यांनी पुरा करून टाकला तो शहीद मिनार ! पूर्व-आशियाच्या रणांगणात भारताच्या मुक्ति मंत्राची दीक्षा घेतलेले जितके म्हणून

लोक शहीद झाले, त्यांचं ते स्मारक ! ह्याची कोनशिला नेताजींनी बसवली होती. त्याला नावरूप नेताजींनी दिलं होतं. ज्या दिवशी ह्या मिनाराचं काम संपलं, त्यादिवशी आझाद हिंद सेनेच्या मंडळींनी त्याच्या पायाशी फुलं वाह्यली. त्यांनी पाह्यलं, हा मिनार म्हंजे खुद्द नेताजींचंच स्मारक आहे.

इंग्रज सैन्य सिंगापुरात आल्या आल्या अॅडमिरल लुई माउंटबॅटनच्या हुकमावरून हा शहीद मिनार त्यांनी सुरुंग लावून उद्ध्वस्त करून टाकला !

युरोपमधलं युद्ध काही मी स्वतःच्या डोळ्यांनी बघितलेलं नाही, तिथं काय काय बीभत्स प्रकार झाले ते मला माहित नाही. पण पूर्व आशियातल्या त्या लांबलचक चार वर्षांत कितीतरी बीभत्स गोष्टी घडताना मी स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्यायत. लढाईत असं नेहमीच घडत असतं. पण त्यातपण चार गोष्टी अशा आहेत, ज्या युद्धाच्या सगळ्या भयाणतेला क्षीण करून टाकतील ! ह्या गोष्टी इतिहासाच्या पानावर युद्धाच्या प्रकरणातदेखील, त्या त्या देशाला कायमचा डाग लावणाऱ्या म्हणूनच राहतील !

ह्या चार अक्षम्य अपराधांपैकी एक झालाय् जपानच्या हातनं. एक झालाय् अमेरिकेच्या हातनं.

युद्धाची घोषणा करायच्या आधीच पर्ल हार्बरवर बाँबवर्षाव करणं हा एक जपानचा भयंकर गुन्हा होता.

त्याचप्रमाणं युद्ध वास्तविक संपायला आलं असताना अमेरिकेनं हिरोशिमा-नागासाकीवर अॅटम बाँब टाकले, हा एक इतिहासात अपूर्व रानटीपणा आहे.

गणितात वजा चिन्ह असलेल्या दोन संख्यांचा गुणाकार मात्र अधिक चिन्हाचा येतो. त्यांची वजा-चिन्हं फिटून जातात. हा दाखला लढाईच्या बाबतीतपण वापरता येत असेल, तर जपान न् अमेरिकेत एकमेकांची फिटंफाट केली


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरी सराय (गया)**

असं आपण म्हणू या.

पण अमेरिकेनं आणखी एक गुन्हा केला होता! अक्षम्य गुन्हा!

हे मी प्रत्यक्ष पाह्यलेलं आहे. तारीख देखील माझ्या लक्षात आहे. १० फेब्रुवारी १९४५. शनवार होता. भर दिवसा दुपारी दोन वाजता अमेरिकन फ्लाइंग फोर्ट्रेस बी-२९ विमानांनी रंगूनमधल्या आमच्या म्यियांग इस्पितळावर बॉंबफेक केली! इस्पितळाच्या इमारतीवर तीस फूट उंच नळावर रेडक्रासचा झेंडा फडकत होता. इस्पितळाच्या छपरावर रेडक्रॉसची प्रचंड खूण निःसंशय पुरावा देत होती, की हे इस्पितळ आहे. पण जाणूनबुजून तब्बल तासभर अमेरिकनांनी ह्या इस्पितळावर कार्पेटबॉंबिंग केलं. सबध इस्पितळ जमीनदोस्त झालं अन् असंख्य रोगी मरून गेले!

ह्या युद्धात आझाद हिंद सेनेचा न् जपानचा पराभव झाला. नाहीतर आयसेनहॉवरला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं रहावं लागलं असतं लढाईत केलेल्या गुन्हेगारीबद्दल! अन् मला खात्री आहे जगातल्या कोणत्याही निःपक्षपाती देशाच्या न्यायाधीशानं हिटलर-आइखमनच्या बरोबरच आयसेनहॉवरलाही ह्या अमानुषपणाबद्दल दोषीच ठरवलं असतं!

मी तर आजदेखील आशा बाळगून आहे की पुढं कधीतरी अमेरिका अख्ख्या जगाला सांगेल — जाणूनबुजून आंतरराष्ट्रीय कायदा मोडून हे किळसवाणं पापकर्म आपण का केलं ते!

जपान न् अमेरिकेच्या ह्या तीन सर्वांत किळसवाण्या गुन्ह्यांच्या तोडीचा आणखी एक गुन्हा घडलाय्! चौथा! ह्या गुन्हा केलाय् तथाकथित सुसंस्कृत इंग्रज मंडळींनी! ह्याची गुन्हेगारी कदाचित् आधीच्या तीन गुन्ह्यांना मागं टाकणारी असेल! सिंगापूरच्या समुद्रकिनाऱ्यावरचा एक शहीदस्तंभ त्यांनी विजयोन्मादानं उडवून दिला!

तुलना काही खरी नसते. तरी मी तुलनाच करतोय्.

कुरुक्षेत्रावरच्या युद्धातपण अन्याय्य गोष्टी बऱ्याच झाल्या होत्या. भीष्म-द्रोण-अभिमन्यु-कर्ण-दुर्योधन ह्यांच्या वधाची वर्णनं वाचता-वाचता मन क्लिन्न होतं. वाटतं, केवढा हा अन्याय! ह्याला काही सीमाच नाही! पण तो अनुभवपण मरून जातो, जेव्हा अश्वत्थाम्याच्या प्रचंड अपकीर्तीची कहाणी आपण वाचतो. रात्रीच्या अंधारात पांडवाच्या शिबिरात शिरून अश्वत्थामा जेव्हा पांडवांच्या झोपलेल्या पाच लहान मुलांना मारून टाकून बाहेर येतो, तेव्हा वाटतं — बीभत्सरसाची पराकाष्ठा झाली ही!

अठरा पर्वांच्या महाभारतात अश्वत्थाम्याचा हा अपराध, हे क्लीबत्व — ह्याला तुलना नाही!

मला म्हणावसं वाटलं होतं — अश्वत्थामा अमर आहे! ह्या विसाव्या शतकातपण तो आहेच! फक्त त्याचं नावरूप बदललंय्! आता त्याचं नाव आहे-ॲडमिरल लॉर्ड लुई माउंटबॅटन!

पण मला वाटतं, ही तुलना काही

ठीक होणार नाही. पुरत्या पराभवाच्या मर्मांतक ग्लानीनं अश्वत्थाम्याचं मानसिक स्थैर्य ढासळलं होतं ! विजयाच्या व्यभिचारानं तो उन्मत्त झालेला नव्हता! पराभव झालेल्या सैनिकानं नीती-बीती झुगारून देऊन केलेला शेवटचा प्रहार, प्रतिहिंसेचं ते सर्वांत बीभत्स रूप--ही एक गोष्ट झाली ! अन् गर्वानं उद्धट झालेल्या विजयी सेनापतीनं हरलेल्या सैनिकाच्या समाधीवर लाथ मारणं--ही एक वेगळीच गोष्ट झाली !

अन् काही झालं तरी अश्वत्थामा काही क्षत्रिय नव्हता. त्यानं क्षात्रधर्माचं पालन करावं अशी आशा बाळगणं व्यर्थच आहे. पण लॉर्ड लुई माउंटबॅटन हा प्रत्यक्ष इंग्लंडच्या राज्याच्या नात्यातला ! त्याच्या धमन्यात तथाकथित सुसंस्कृत इंग्रज राजवंशाचं तेच निळं रक्त !*

त्याच रात्री आपल्या विश्वासू लष्करी चिटणीसांना घेऊन नेताजींनी एक बैठक भरवली. तीच शेवटची. बैठक होती पुढच्या कामाबद्दल.

श्री. ए. एन. सरकार त्याचदिवशी संध्याकाळी बँकॉकहून सिंगापूरला येऊन पोचले होते. सरकार यायच्याआधी आमचं जवळपास ठरूनच गेलं होतं की नेताजींनी सिंगापुरातच राहवं न् ब्रिटिश सैन्य सिंगापुरात आलं की त्याच्यासमोर शरणागति पत्करावी.

हा निर्णय घ्यायच्या आधी बराचवेळ चर्चा झाली होती ह्याच्याबद्दल. ह्या चर्चेला नेताजीपण हजर होते. त्यांनी शांत चित्तानं ह्या चर्चेत भाग घेतला होता असं मी सांगितलं, तर सगळं सांगितल्यासारखं व्हायचं नाही. मधनं-मधनं ते थट्टाविनोदपण करत होते.

सरकार आल्यावर चर्चेनं वेगळंच वळण घेतलं.

कुणीकुणी म्हणालं--आझाद हिंद

---

*इंग्रजीत guilt-conscious असं एक विशेषण आहे. इंग्रज लेखक Hugh Toyeनं लिहिलेलं सुभाषचंद्रांचं प्रख्यात चरित्र--The Springing Tiger--वाचता-वाचता ह्या शब्दाचा अचानक अर्थबोध झाला ! नेताजी शेवटचं सिंगापूर सोडून गेले त्याच्या आधीची गोष्ट ह्या पुस्तकात लेखकानं सविस्तर दिलेली आहे. फक्त नेताजींचं स्ट्रॅचीशी जे बोलणं झालं, ते द्यायचं मात्र लेखक बेमालूम विसरून गेलेला आहे. शहीद-मिनाराची कोनशिला बसवण्याचं एक छायाचित्र पुस्तकात दिलंय. अन् बांधून पुरा झाल्यावर ह्या शहीद-मिनारानं काय रूप घेतलं होतं, तेही आणखीएका छायाचित्रानं वाचकांना सांगितलंय्. फक्त हा शहीद-मिनार जमीनदोस्त कसाकाय हे मात्र वाचकांना सांगायला लेखक विसरलाय्. पुस्तकाच्या प्रस्तावनेत Philip Masonनं नेताजींच्याबद्दल म्हटलंय्--power corrupted him; he grew more arrogant, more intolerant, more certain. मॅसन हे कदाचित् माउंटबॅटनबद्दल म्हणाला असं वाचकांना वाटू नये म्हणून शहीद-मिनाराबद्दल निमूट राह्यलेलंच बर--असं तर लेखकाला वाटलं नसेल !

सेनेनं सिंगापुरातच आत्मसमर्पण करावं. पण नेताजींनी आपल्या निवडक सहकाऱ्यांच्याबरोबर भूमिगत व्हावं. म्हंजे लढाईनंतरही भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीकरता एक नवीन क्षेत्र तयार होईल.

बऱ्याचजणांचा असा अंदाज होता की फॅसिझमच्या भीतीमुळंच ऑर्थोडॉक्स इंग्लंड अन् भांडवलशाहीचा झेंडा उडवणाऱ्या अमेरिकेनं मार्क्स-लेनिनच्या एशियाबरोबर हातमिळवणी केल्याय्. नाईलाजानं. आता लढाई संपल्यावर काही ही फळी टिकायची नाही. तेव्हा इंग्लंड न् रशिया एकमेकांचे शत्रु होणं अगदी शक्य आहे. भांडवलशाही न् समाजवाद ह्यांच्या दरम्यानच महायुद्धही काही फारसं लांब नाहीच. नेताजींनी रशियात लपून राहून भारताची स्वातंत्र्याची चळवळ चालवणं आज कितीही अशक्य कोटीतलं वाटलं, तरी लवकरच ते सहजशक्य होईल.

इथं नेताजी मधे पडले. त्यांनी आपला विरोध जाहीर केला.

ते म्हणाले—तुमची एक चूक होतेय् भारताला स्वातंत्र्य मिळायला काही आता दोन वर्षाच्यापेक्षा जास्ती काळ लागायचा नाही. तुम्ही विचार करून पहा—आज मी स्वतःला त्यांच्या हाती सोपवलं तर काय होईल ? युद्ध-गुन्हेगार म्हणून इंग्रज माझ्यावर खटला भरतील. पण कुठं ? पूर्व-आशियात माझ्यावर खटला भरायची हिंमत इंग्लंडला व्हायची नाही. सिंगापूर, बँकॉक किंवा रंगूनला हा खटला चालवणं अशक्य आहे. मग ? दिल्लीत ! लालकिल्ल्यातच ! त्यांच्या न्यायालयात ते नक्कीच मला दोषी ठरवतील. म्हंजे मृत्युदंड ! फाशी, नाहीतर फायरिंग स्क्वाड !

---


माणूसमधून
प्रसिद्ध झालेली
अरूण साधू
यांची
लेखमाला

फिडेल
चे
आणि
क्रांती

पुस्तकरूपात
प्रसिद्ध झाली

राजहंस
प्रकाशन

मग ? मला पक्की खात्री आहे की त्याच्यानंतर एकाच महिन्याच्या आत भारत स्वतंत्र होऊन जाईल ! कारण युद्धानंतर भारतातल्या ह्या लक्षावधी माणसांची तोंडं बंद करता यायची नाहीत ! आझाद हिंद सेनेची कीर्तीकहाणी काही केल्या दडपून ठेवता यायची नाही ब्रिटिश प्रचारकांना ! खटला चालू असतानाच सबंध भारत म्हंजे एक दारूगोळ्याचा ढीग बनून जाईल ! माझ्या मृत्यूनंच त्याला बत्ती लागेल ! हे अगदी निश्चित ! दुसरं म्हंजे काय होईल ह्या भीतीनं इंग्रज मला सोडूनही देतील ! तेव्हा मग रशियात नाही, माझ्या मातृभूमीत उभं ठाकूनच मी आमरण संग्राम सुरू करीन ! ह्या संग्रामात काही समझोता नसेल !-- तेव्हा दोन्हीपक्षी आपलं काहीच नुकसान होऊ शकत नाही !

नेताजींचा युक्तिवाद बिनतोड होता. हा युक्तिवाद त्यांनी आधीपण ऐकवला होताच. हेच त्यांनी मनाशी पक्कं केलं होतं ! बाकीच्या लष्करी अधिकाऱ्यांच्याबरोबर सिंगापुरातच आत्मसमर्पण करायला तेपण बद्धपरिकर होते !

पण हा सगळा जुनाच युक्तिवाद. ह्या खेपेला मात्र तसं झाल नाही. कारण सरकारांची बुद्धीपण भलतीच कुशाग्र होती. त्यांनी आपलं म्हणणं थोडक्यात मांडलं. थोडंच पण जोरदार ! नेताजींना दुग्ध्यात पडतांना हे पहिल्यांदाच मी पाहूचलं.

सरकार म्हणाले--तुम्ही म्हणताय् ते सगळं बरोबर आहे. पण आज जर तुम्ही आत्मसमर्पण केलं नाहीत तर काय होईल, ह्याचाही विचार करून बघा ना ! होईल तेच ! काही फरक पडायचा नाही त्याच्यांत !

मेजर-जनरल भोसले, शहानवाज, चतर्जी, धीलन, सैगल किंवा माझ्यावर सरकार खटला भरेल. आमच्यापैकी काहीजणांना किंवा सरसकट सगळ्यांनाच ते फासावर लटकावेल ! पण म्हणून काही आझाद हिंद सेनेच्या वीसवीस हजार सैनिकांना काही फांशी होऊ शकत नाही ! म्हंजे फळ एकच की ! आमच्या मरणानं दारूगोळ्याच्या ढिगाला बत्ती लागेल ! ब्रिटिश इंडियाची भारतीय फौज बंड करून उठेल ! अन् समजा काही कारणानं नाही लागली आग, मग त्यावेळी निदान एका माणसाला लांबून पहिली ठिणगी टाकावी लागेल ! ते काम काही आम्ही कुणीच करू शकणार नाही. पण नेताजी, ते काम तुम्ही करू शकाल ! जर तेव्हा तुम्ही जिवंत असाल तर ! तुम्हाला त्यांच्या हाती सापडायचंच असेल, तर सापडा ना ! पण आज नको ! अजून तीन महिन्यानंतर ! तोपर्यंत आमच्या खटल्याचं नाटक संपत आलं असेल ! आझाद हिंद सेनेची कीर्तिकहाणी पसरली असेल भारताच्या प्रत्येक खेडेगावात !

मला वाटतं, तुम्ही आज आत्मसमर्पण करण्यापेक्षा तीन महिन्यानंतर केलंत, तर ते जास्ती परिणामकारक होईल !

नेताजी काळजीत पडलेले दिसले.

[ क्रमशः ]

सांस्कृतिक मद्रास

# युनियनबाजी

चंद्रकांत अंबाडे

कुठला बरे दिवाळी अंक आहे? वि. आ. बुवांचा लेख आहे, 'संपाकडून संपाकडे' त्यामध्ये! हां, 'मधुकंस' दिवाळी अंक. आधी संप करायचा आणि नंतर मागण्या शोधायच्या म्हणे. कामगारांना त्यांच्या दुःखांची आठवण नेते करून देतात, मग त्यांना ती कळतात. टॅक्सीवाले संपावर, बसवाले संपावर, डबेवाले संपावर, भांडीवालीसुद्धा संपावर! आधी मी खूप हसलो अन् हसता हसता एकदम गप्प झालो. समोरच वर्तमानपत्रांत जाहीर निवेदन होते 'बंगलोर हिंदुस्थान मशीन टूल्सचा लॉक औट संपला ९ डिसेंबरला.'

बंगलोरच्या कामगारांनी 'मधुकंस' वाचला की नाही कोण जाणे, पण मद्रासच्या डनलॉप रबर फॅक्टरीने तो तंतोतंत आचरणात आणला अन् दिवाळी संपताच तेरा नोव्हेंबरला फॅक्टरी बंद पडली, ती आज हा लेख लिहितोय तोवर बंदच आहे. दोन नोव्हेंबरपासून कलकत्याचीही डनलॉप फॅक्टरी बंदच आहे. आपल्याला काय करायचंय त्याचेशी' म्हणता? तुमच्या स्कूटरचे टायर, किमान सायकलची टयूब बाजारात केवढयाला घेता आपण? बसेसने प्रवास करताना ड्रायव्हरला विचारा की वेटिंग लिस्टवर केव्हापासून होती गाडी? इतके दिवस संप म्हटला की, कामगार-मालक वाद, हेच समजून चालत होतात ना तुम्ही? पण आज समजूत जुनी झालीय ती! सध्या मद्रासमधील संप चालू आहेत, कामगारांच्या युनियन्सच्या आपापसातील मारामाऱ्यांमुळे. अन् युनियन्स म्हणजेच त्यांचे पुढारी म्हणजेच राजकीय पक्षांनी खेळण्यासाठी वापरलेली निर्जीव प्यादी!

आता डनलॉपचेच पहा ना! मद्रास-आवाडी रस्त्यावरती, अंबत्तूरला भली मोठी फॅक्टरी. बसमध्ये झोपला असाल तरी डनलॉपचे आगमन, रबराच्या उग्र वासानेच जाग आणील. सहाच महिन्यांपूर्वी हीच फॅक्टरी जवळजवळ दोन महिने बंद पडली होती. त्या संपातून

भरमसाठ पगारवाढ पदरात पाडून घेतलीच होती. आपला हा प्रचंड विजय ती युनियन सर्वत्र सांगत होती. सत्तारूढ पक्षाच्या धोरणानुसार प्रत्येक ठिकाणची मुख्य युनियन द्रमुक-प्रणीतच हवी. तसे नसेल तर, त्या दुसऱ्या पक्षाचे (म्हणजेच इंटक-कांग्रेसप्रणीत) युनियनला त्रास देऊन नामोहरम करणे. डनलॉपमधील दुसऱ्या असंतुष्ट युनियनवाल्यांनी तेरा नोव्हेंबरला 'बसून राहाण्याचा' संप चालू केला. त्याला निमित्त पुरले एका प्रोबेशनवरील कामगाराला काढून टाकल्याचे. आठ दिवसातच कंपनी शरण आली अन् लेबरमंत्री मध्यस्थी करण्यात यशस्वी झाले. कंपनी त्या कामगाराला परत घेण्यास तयार झाली. आता आली का पंचाइत? संपाची मूळ मागणीच संपली. मग कामगार नेते बाहेरच्या झोपडीवजा टेंपररी तंबूत डोके खाजवीत, मागण्या शोधून काढण्यास बसले. दहाबारा मागण्या तयार केल्या व आत्ताच्या आत्ता त्या मान्य झाल्या पाहिजेत म्हणे. चालकांना हा अचानकपणे टोलाच होता. बस्स! २२ नोव्हेंबरला संपवाल्यांच्या पाठीराख्यांनी नुसते बसणे सोडून दिले व मोडतोड सुरू केली. एक कार जाळताच चालकांनी टाळेबंदी जाहीर केली! मागण्या पाहायच्यात? कामगारांना रहायला घरे हवीत, स्वतंत्र शाळा हवी मुलांसाठी व डॉक्टरांची औषधांची बिले कंपनीकडून हवी होती.

घर बांधायला बिनव्याजी कर्ज एल-आयसी पण देत नाही, मग इथे प्रत्येकाला बिनव्याजी कर्ज कसे देणार? कंपनी म्हणे कामगारांनी सहकारी सोसायटी स्थापून, रजिस्टर करून मग अर्ज करावा. सोसायटीला कर्ज देवू, पण वैयक्तिक कुणाकुणाला देणार. मद्रास राज्यात सध्याच पी. यु. सी. पर्यंतचे शिक्षण मोफत आहे, मग स्पेशल शाळा कशाला? शिवाय आजची प्राथमिक शाळा, उद्या माध्यमिक करावी लागेल. शिक्षकांचे पगार कंपनीने का द्यावेत? फारतर इमारत बांधून देण्याचा विचार करू, तुम्ही आधी शाळा तर सुरू करा. आता मजेशीर मागणी बघा. परवाच्या पगारवाढीपर्यंत बहुसंख्य कामगारांना, कामगार विमा योजनेखाली ESI Hospital तर्फे औषधपाणी मिळत असे. पण आता पगाराची मर्यादा ओलांडल्यामुळे ती सवलत बंद झाली ना. तेव्हा, बाहेरच्या डॉक्टरांची बिले कंपनीनेतरी द्यावीत किंवा स्वतःचे खास हॉस्पिटल काढावे म्हणे! वास्तविक ही चुरस दोन युनियन्समधील की, कोणती युनियन कामगारांचा अधिक फायदा करून देते? आता महिनाभर पगार नाही, मग काय त्या मागण्यांना काडी लावायची?

तुम्ही खूप लावाल हो काडी, पण आगपेटी आहे का जवळ? का? आगपेट्यांची प्रचंड फॅक्टरी विम्को, ४ आक्टोबरपासून बंद आहे ना! मद्रास–दिल्ली मार्गावर विम्कोनगर हे खास रेल्वेचे लोकलस्टेशन. लेबलिंग मशीनवर एका कुणा रोजंदारीच्या मजुराला कामाला लावले हे निमित्त झाले अन्

प्रथम तो सेक्शन बंद पडला – पुढे १४ नोव्हेंबरपासून संपूर्ण फॅक्टरीच. इथे दोन्ही कम्युनिस्ट पक्ष आपापसात लढत आहेत व सध्याचा संप म्हणजेCP(M) युनियनने सत्ता काबीज करण्याकरिताच घडवून आणलेला आहे. सध्याचे मान्य युनियनचे सेक्रेटरी कुचेलर हे सुमारे ५० कंपन्यांच्या युनियन्सचे लोकप्रिय सेक्रेटरी आहेत. सिम्प्सन समूह हे महत्वाचे उदाहरण. सध्या ते खून, फसवणे, वगैरे आरोपाखाली कैदेत असून, जामीनावर पण काही अटीवर मोकळे आहेत. त्यांच्या अनुपस्थितीचा फायदा उठविण्यासाठी मार्क्सवाद्यांनी हा संप घडवून आणलाय. वास्तविक काही मुठभर कामगारांच्या १/१० संपामुळे, कंपनीला सर्वांनाच ले ऑफ द्यावा लागला. आपली चूक नसताना लादलेला ले-ऑफ पाहून बाकीचे ९/१० कामगार चिडले. त्याचा फायदा उठविण्यासाठी लगोलग युनियनवाल्यांनी मागण्यांची यादी बनवून, संपाचीच हाक दिली. तुम्हीच आता हातावरच्या "डे डेट" घड्याळात दिवस मोजा. पण ते घड्याळ HMT चे असेल तर ?

हां, HMT चे डे-डेट रिस्टवॉच तुमच्यापर्यंत इतक्यातच पोहोचणार कसे ? गेली दहा वर्षे धडपड करून एकदाचे तसे दिवस, तारीख दाखविणारे स्वयंचलित मनगटी घड्याळ बनविण्यास कंपनीला आत्ताशीच कुठे यश आलंय. हा शुभदिन कसा साजरा करावा ? कामगारांनी मागणी केली की, दोन बँडचा ट्रान्झिस्टर प्रत्येकाला सप्रेम भेट द्यावा. कंपनी एकेक बँडवाला देण्यास तयारी झाली, अन् नेमकी माशी शिंकली.

त्याचे काय आहे, बंगलोरची ही सार्वजनिक क्षेत्रामधील एकुलती एक कंपनी फायद्यात होती इतके दिवस. पब्लिक सेक्टरला अन् फायदा हे ऐकायला कानाला कसेतरीच लागते. इथे दोन युनियन्स. एक काँग्रेसची इंटक, आणि कम्युनिस्टप्रणित दुसरी आयटक. इंटकला १९६१ पासूनच मान्यता. तिची लोकप्रियता घसरगुंडीला लागून, आयटक बळवान झाली, पण १९६८ साली मान्यतेसाठी अर्ज करूनही १९७२ डिसेंबरपर्यंत आयटकला मान्यता मिळाली नव्हती. सरकार मान्यता देण्याबद्दल विचार करीत होते, ही चार वर्षे! बस्स, दोन युनियन्सवाल्यांना भांडणे करण्यास हे मान्यतेचे कारण पुरले, आपापसातील कुरबूर, मारामाऱ्यांवर आली. इंटकवाल्यांना 'मान्य युनियन' म्हणून पोलिसांची मदत मिळू लागली. त्याने प्रकरण अधिकच चिघळले अन् ९ ते २१ सप्टेंबर ७२ फॅक्टरीस टाळे लागले. तडजोड न होता कारखाना उघडला व संचालकांनी बोलणी करण्यास दोन्ही युनीयनच्या प्रतिनिधींना बोलावले. त्यामुळे इंटकवाले चिडले. ९ नोव्हेंबरला बैठक सुरू होण्यापूर्वी दोन्ही पक्षांनी दगडफेक, धरणे, मोडतोड केली, अर्थातच दुसरे दिवशी आठजण सस्पेंड झाले व सोळांना चार्जशीटस् मिळाले. १० नोव्हेंबरला आयटक-

वाल्यांनी पुरेपुर बदला घेतला. इंटकवाले सुपरवायझर्स आणि नेत्यांना ठोकून तर काढलेच, पण त्यांचे ऑफीसही उध्वस्त केले, व दगडफेक करून काचा फोडण्यास सुरुवात करताच १० वाजता व्यवस्थापकांनी टाळेबंदी जाहीर केली ती ९ डिसेंबरला संपली !

देशाची आज गरज आहे दरसाल ३० लाख रिस्टवॉचेसची. तर तयार होतात पाच लाख ! बाकीची अर्थातच स्मगल होतात. बंगलोरच्या २ कारखान्यात ५२०० कामगार असून, रोजी ६०,००० रु. पगार होतो. रोजचे उत्पादन ४ लाखांचे होते. पण ह्या टाळेबंदीमुळे एका कोटीचे नुकसान झाले आहे. आता कामगारांना एकेक महिन्याचा पगार अॅडव्हान्स दिलाय व एप्रिल ७३ पासून, सहा महिन्यात तो कापून घेतला जाईल ! ही सारी किमत सत्तारुढ पक्षाने कशासाठी दिली ? केवळ स्वतःच्या पक्षाचे युनियनचे आग्रहासाठी दुसऱ्या युनियला मान्यता न देण्याचे अट्टाहासापोटी ! म्हणूनच परवा पार्लमेंट मध्ये एक खासदार आपल्या भाषणात म्हणाले, हा तोटा दोन्हीही पक्षांकडून भरून घ्यावा—खरेच, असेच झाले तर ?

□ □ □

## हे नेहमीचंच....

पृष्ठ १७ वरून

जखमी झाली. त्यातले तीन तर मिरवणुकीतलेच विद्यार्थी होते.

मग काय विचारता गोंधळ ! ह्या पोलिस कॉन्स्टेबला नोकरीवरून काढून टाका म्हणून विद्यार्थी जमावाची नवीच मागणी सुरू झाली. तोवर शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलिसांच्या दहाबारा गाड्या येऊन धडकल्या देखील.

इकडे चर्चेत मग्न असलेले मुख्यमंत्री बातमी ऐकताच हातचे काम टाकून धावत आले. मग तर विद्यार्थ्यांना आणखीच आवेश चढला. पोलिस कॉन्स्टेबलला चांगली शिक्षा करावी व शिवाय नोकरीवरून काढून टाकावे म्हणून उच्च स्वरात ते सर्व ओरडू लागले.

मग नाटकाचा पुढचा भाग सुरू झाला. मंत्री एका व्हॅनच्या टपावर चढून उभे राहिले. ‘शांत व्हा...शांत व्हा...’ त्यांचा आवाज सगळ्यांच्या कानापर्यंत पोचेल तर ना ? ‘अरे, एखादा माईक मिळेल काय ?’ त्यांनी पोलिसांच्या कंपूला पृच्छा केली. ऐन वेळी माईक कुठला मिळायला ? मग कुठून तरी एक साधा पोंगा आणला गेला. अन् मुख्यमंत्री त्यातून बोलू लागले. ‘हे पोलिस अगदीच नालायक आहेत !’ त्यांनी प्रथम शेरा मारला. मग भाषण सुरू केलं—

‘विद्यार्थ्यांनो, असे अधीर होऊ नका.

माझे म्हणणे जरा ऐकून घ्या. कायदा तुम्ही आपल्या हाती घेण्याची गरज नाही. विद्यार्थी म्हणजे आमचे सर्वस्व. ह्या तरुण पिढीसाठी आम्ही काय करणार नाही? अरे, प्रथम तुमच्या मागण्यांचाच आम्ही विचार करू. तुम्हाला कोणत्याही तऱ्हेने आम्ही दुखविणार नाही, बरं...पण तुम्ही आता शांत व्हा. अशी हूल्लडबाजी माजवू नका.'

श्री. सुब्रत मुखर्जी तेथेच होते. मोठा हुषार माणूस बाकी. इकडे छात्र परिषदेचा अध्यक्ष असला तरी गृहमंत्रीपदावरही विराजमान आहे. ते म्हणाले, हा गोळीबार म्हणजे शुद्ध अन्याय आहे. आपल्याला हे मुळीच सहन होणार नाही.' आपण गृहमंत्री असलो म्हणून पोलिसांची बाजू घेऊ असा गैरसमज विद्यार्थ्यांनी करून घेऊ नये असे त्यांनी विनतिपूर्वक सांगितले. एवढेच नव्हे, वेळ आली तर मंत्रीपदाचा राजीनामा देऊन आपण विद्यार्थ्यांच्या बाजूनेच उभे राहू असेही त्यांनी आश्वासन दिले.

ह्या भानगडीत जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना बघण्यास मुख्यमंत्री हॉस्पिटलमध्ये गेले होते. एकदा नव्हे, दोनदा! साहजिकच त्या विद्यार्थ्यांची देखभाल व्यवस्थित होऊ लागली. आरोग्य मंत्र्यांपासुन साऱ्यांचेच त्यांच्याकडे लक्ष आहे. अत्यंत सिरीयस असलेल्या विजय डे ची शुश्रुषा विशेष काळजीपूर्वक केली जात आहे. मधून मधून मंत्रीमंडळ त्याच्या भेटीला जात असते. शिवाय छात्र परिषदेचे विद्यार्थी तर डोळ्यात तेल घालून सतत त्याच्या उशाशी बसून आहेत.

मंत्र्यांचे हे वागणेदेखील नाटचमयच —अगदी नवल करण्यासारखेच! एकूण ह्या वागण्यात अंतस्थ हेतु काय आहेत कोण जाणे! विद्यार्थ्यांना मात्र एकाएकी भलतेच महत्त्व प्राप्त झालेय् एवढे खरे!

ह्यापूर्वी अशा कैक विद्यार्थ्यांना कारणाशिवाय बलिदान करावे लागले पण त्यांची कधीच कोणी दखल घेतली नव्हती. कदाचित् त्यावेळी छात्र परिषदच शक्तिहीन असावी (किंवा आता विद्यार्थ्यांचं 'प्रेस्टीज' वाढलं असावं.)

घडलेल्या घटनेबद्दल पाच तारखेला सर्व शाळांकॉलेजांनी हरताळ पाळला. विद्यार्थी काळी निशाणे घेऊन हिंडत होते. उल्लेख करण्याजोगा एक हास्यास्पद प्रकार म्हणजे एकूण पाच मंत्र्यांनी 'ह्या हरताळास आपली सहानुभूति आहे' असे एकमुखाने जाहीर केले. वास्तविक हे विधान मांडण्याची आवश्यकताच नव्हती. कारण छात्रपरिषद ही कॉंग्रेसचीच एक शाखा आहे. तिने घेतलेल्या निर्णयाला कॉंग्रेसची सहानुभूति गृहीतच असते. तेव्हा असे वेगळे विधान मांडणे निरर्थकच नव्हे काय?

छात्रपरिषदेचे अध्यक्ष श्री. सुब्रत मुखर्जी म्हणाले की ज्या पोलिसाने गोळ्या झाडल्या तो व इतर अनेक पोलीस हे युनायटेड फ्रंटचे राज्य असताना नोकरीला लागलेले आहेत. कॉंग्रेस राजवटीचा अपमान करणे आणि जनता व राज्यकर्ते यांची मने एकमेकांविषयी कलुषित करणे हेच मुळी त्यांचे ध्येय आहे.

□ □ □


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
heros' SBC-45 MAR
MALTeX
BISCUITS
SATHE
MALTeX
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटें
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

## पुण्याच्या नाटचस्पर्धा

पृष्ठ १५ वरून

प्रमाण नाटचपरिणामाला घातक ठरले. उदा. डॉक्टर्स आणि मुलाचे आईवडील. तसेच आईवडिलांच्या एका प्रसंगातील संवाद मुद्दाम तयार केलेले, खोटे वाटले. पण नाटचविषय आणि मांडणी निश्चितच परिणामकारक वाटली.

या नाटकात हळदणकर आणि प्रेषिताच्या भूमिकेत होते वासुदेव पाळंदे ! बऱ्याच वर्षांनी पाळंदे यांचे रंगभूमीवर दर्शन घडले. पुण्याच्या हौशी रंगभूमीत जे काही जाणकार आणि चांगल्या ताकदीचे नट आहेत, त्यामध्ये पाळंदे हे एक. त्यांनी हळदणकर आणि (प्रेषित) आजोबा या दोन भूमिकातील फरक आपल्या आवाजाने, चालण्या वागण्याने मोठ्या ताकदीने व्यक्त केला. ते काम कोठेही भडकपणाकडे जाऊ न देता संयमस्वरूपात केले. पुन्हा पुन्हा पहावे असे त्यांचे काम आहे. तितकेच चांगले काम अरविंद भावे या लहान मुलाने केले. त्याला तसे शब्द कमी आहेत. पण मुद्दाम पाठांतर करून, खोटा अभिनिवेश धारण करून जी अकारण सहानुभूती मिळविली जाते, तशी त्याच्या कामात कोठेही नव्हती. कारण त्याने अगदी सहजपणे भूमिका केली. खरेतर तो तेवढा काळ ती भूमिका जगला असेच म्हणावे लागले. नर्स झालेल्या धनश्री भोगले यांनीही आपली भूमिका समतोल केली. एका छोटचा भूमिकेत लक्षात राहिल्या प्रमिलाबाई बेडेकर (हळदणकरची आई) ! याच्या व्यतिरिक्त असलेल्या पात्रांमध्ये आई (कल्पना गोसावी) वडील (सुभाष गोडबोले) आणि डॉक्टर्स या सर्वांचे बोलणे निर्जीव परिणामहीन, काही ठिकाणी खोटे वाटले. नाटचपरिणाम गमावून बसले, त्यातल्या त्यात अनिल गाडगीळ (थोरले डॉक्टर) यांनी दुसऱ्या अंकात काम चांगले केले. शेवटी लक्षात राहिले ते वासुदेव पाळंदे आणि अरविंद भावे !

नाटकाचे नेपथ्य (राजा नातूंचे) आटोपशीर, अर्थवादी, सूचक पद्धतीचे होते. नाटकाच्या दृष्टीने एकच घटनास्थळ असल्याने आणि अनेक प्रवेश असल्याने नेपथ्य सूचकच हवे होते. ट्रॉलीचा वापर करून, दाराच्या चौकटी, चौथरे यांच्या साह्याने तेच नेपथ्य निरनिराळया प्रवेशांना परिणामकारकरीत्या वापरले गेले. पण दुसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशातील दाराची चौकट रंगमंचाच्या डाव्या बाजूच्या प्रेक्षकांना त्रासाची वाटली. नेपथ्य रचनेसाठी दोन प्रवेशांमध्ये जाणारा काळ प्रारंभी असह्य करणारा होता. पहिल्या प्रवेशाचा परिणाम पुसून टाकणारा होता. संगीताने जरी तो भरून काढण्याचा प्रयत्न केला तरी ते साधू शकले नाही. मोजक्या वस्तूंनी उभारलेले हॉस्पिटल नाटचकथेशी सुसंगत होते.

प्रेषितचे दिग्दर्शक होते माधव वझे. राज्य नाटच स्पर्धेतील हे पहिलेच दिग्दर्शन. त्यांनी नाटक उत्तमपणे

दिग्दर्शित केलेले होते. हॉस्पिटलमध्ये एका प्रसंगात मुलगा, आई, वडील आणि आजोबा, अंधुक प्रकाशात सिगारेट ओढणारा डॉक्टर, पांगळी झालेली नर्स आणि मुलगा अशी काही स्मरणीय काम्पोझिशन्स होती. प्रेषितमधला नाट्यविषय भडक भावविवश होण्याची शक्यता अधिक होती. पण दिग्दर्शकाने तो संयम पाळून हे नाटक कोठेही भाव-विवश होऊ दिले नाही. प्रेक्षकांवर परिणाम करण्यासाठी खोट्या कल्पनांचा, साधनांचा वापर केला नाही. प्रयोगाला संयत रूप ठेवण्याचा प्रयत्न केला. कलोपासकांच्या आजवरच्या प्रतिष्ठेला साजेलसे दिग्दर्शन झाले. तरीही काही पात्रांमुळे नाट्य परिणाम जो क्षीण होत होता, तो काढून टाकणे आवश्यक होते. अजूनही त्यांना ते करता येईल. प्रयोग अधिक रेखीव परिणामकारक करणे शक्य होईल. कारण तेवढी कलात्मक समर्थता आणि कल्पकता दिग्दर्शक या नात्याने त्यांच्याकडे आहे. ते त्यांनी यापूर्वी बसवलेल्या एकांकिका नाटकातून सिद्ध झालेले आहे. नाटकाला भास्कर चंदावरकर यांचे संगीत आणि बाळ मोघे यांची प्रकाश योजना समाधानकारक होती. काही उणीवा मान्य करूनही एक चांगला प्रयोग पाहिल्याचे समाधान कलोपासकियांनी दिले.

या वर्षीच्या नाट्यस्पर्धांची पहिली फेरी झाली. त्याचा निकालही प्रगट झाला. निकालावर भाष्य करणे योग्य नव्हे. पण दोन तीन नाट्य संघांचे प्रयोग सोडले तर इतरांनी पूर्णतः निराशा केली. काहींच्या तर रंगीत तालमी या प्रयोगाच्या निमित्ताने झाल्या. केवळ हौस, इच्छा आणि परिश्रम असून चालत नाहीत. त्याला कलात्मक जाणीवेची जोड पाहिजे. त्या दिशेने प्रवास पाहिजे. तो अनेक नाट्यसंघांचा नव्हता. केवळ प्रयोग साजरा करणे एवढाच हेतू दिसला. तो दुःखद आहे. चिंताजनक आहे. स्पर्धा पाहून वाटले की इतक्या मोठ्या प्रमाणात पैसा, श्रम खर्ची होतात, त्यातून साधते काय? आणि यात सुधारणा होणार नसेल तर हे सारे कशासाठी? आम्ही प्रेक्षकांनी असे कोणते पाप केले म्हणून बहुसंख्य प्रयोग सुमार निघावेत? ◻ ◻ ◻

## न रंगलेले 'भाऊबंदकी'

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने मुंबई मराठी साहित्यसंघाने त्यांच्या 'भाऊबंदकी', 'सवाई माधवराव' या दोन नाटकांना नव्याने प्रयोगरूप दिले. ही स्वागतार्ह गोष्ट आहे. साहित्यसंघाने तसे करण्यात औचित्य आहे. 'भाऊबंदकी'ला दिल्लीच्या नाट्यमहोत्सवात पारंपारिक नाटकाचे पारितोषिक लाभले. या पारितोषिकाने खुद्द त्या नाटकाची, नाटककाराची आणि पर्यायाने मराठी रंगभूमीची शान वाढली. दिल्लीच्या प्रयोगात नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे, केशवराव दाते, मामा पेंडसे, मा. दत्ताराम इत्यादी गुणसंपन्न कलाकारांचा

सहभाग होता. त्यामुळे साहित्यसंघाने जेव्हा काही निराळे कलाकार घेऊन पुन्हा प्रयोग सादर करण्याचे घोषित केले, तेव्हा सर्वांच्याच अपेक्षा उंचावल्या. पूर्वस्मृतींना उजळा मिळाला.

पण पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात 'भाऊबंदकी 'चा प्रयोग पाहिला आणि कमालीची निराशा झाली. या प्रयोगाच्या दर्शनापेक्षा पूर्वस्मृतीतील सुखद आठवणीच अधिक सुखावह वाटल्या! 'भाऊबंदकी 'च्या नाट्यलेखनाबद्दल किंवा कथानकाबद्दल नव्याने समजावून सांगण्याचे काहीच प्रयोजन नाही. त्यातल्या अभिनयासंबंधी—दिग्दर्शनासंबंधी लिहिणे महत्त्वाचे आहे. या नाटकातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा म्हणजे राघोबा, आनंदीबाई आणि रामशास्त्री. त्यानंतर लक्ष वेधले जाते नाना फडणवीस, सखारामबापू, चमक—नमकशास्त्री वगैरे लोकांकडे!

राघोबा झाले होते दाजी भाटवडेकर! प्रयोग न रंगण्याला जी काही कारणे आहेत, त्यामध्ये दाजींचा अभिनय हे एक प्रमुख कारण आहे देहयष्टीच्या दृष्टीने रंगमंचावर ते राघोबा दिसले, हे निश्चित. परंतु राघोबाच्या व्यक्तित्वातील पापभीरूपणा, स्त्री—लालसा, पापीकृत्याच्यावेळची मनाची चलबिचल, पुतण्यावरचे अपत्यवत प्रेम, पेशवेपदाची अपार मनिच्छा, पराक्रमासंबंधीचा आत्मविश्वास अशा कित्येक छटा ते प्रभावीपणाने दाखवू शकले नाहीत. त्याला माझ्या दृष्टीने एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची संवाद म्हणण्याची सदोष पद्धती. एकतर ते अनेकदा जलदगतीने अकारण बोलत होते. काही शब्द तोंडातल्या तोंडात फिरत होते. ऐतिहासिक भाषा बोलण्याचा जो एक परिणामकारक डौल असतो, तो तर बिल्कुल नव्हता. आनंदीबाईबरोबरचा प्रणयप्रसंग, त्या अगोदरचे आरशात पाहून म्हटलेले स्वगत, रामशास्त्री देहांत प्रायश्चित्ताची सजा सांगतो त्याचवेळचा प्रसंग, हे सारे अभिनयाच्या दृष्टीने निर्जीव झाले. ज्या दाजींनी काकाजी जनमानसावर कायमचा बिंबित केला, विश्राम बेडेकरांच्या 'वाजे पाऊल आपुले ' मधील भूमिका चिरस्मरणीय केली त्यांना राघोबाचे


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०.

# कुटुंब नियोजनाबद्दल

## तुम्हांला सर्व माहिती आहे ?

तसें असेल तर, हा मजकूर वाचूं नका. परंतु माहिती असूनहि तिचा व्यवहारांत उपयोग न करणाऱ्यांपैकी तुम्ही असाल तर मात्र तुम्हांला हें वाचलेंच पाहिजे.

थोडीशीच माहिती असल्यामुळे तिचा व्यावहारिक उपयोग करायला तुम्ही धजावत नसाल तर आम्हांला भेटा. तुमचे प्रश्न शंकाकुशंका, संघर्ष, सगळेंच कांहीं–म्हणजेच तुम्हांला मदत करण्यासाठीच आम्ही सगळे आहोंत इथे.

डॉक्टर तुमच्या समस्या ऐकून घेतील. तुमच्या गरजेनुसार योग्य ते उपाय सुचवतील. कोणतेहि प्रश्न विचारा.




अधिक जाणून घेऊं इच्छिणाऱ्यांचे आम्ही स्वागत करीत असतो

davp 72/460

आव्हान पेलणे अशक्य नव्हते. पण ते पेलले नाही हे खरे! त्यामानाने आशालता वाबगावकर यांनी आपल्या सर्व कलात्मकशक्ती आनंदीबाईच्या कामासाठी खर्ची घातल्या. त्यांच्या अभिनयाच्या मर्यादा या आनंबाईच्या भूमिकादर्शनाच्या मर्यादा ठरल्या; हे जरी खरे असले तरी त्यांनी आनंदीबाईचे व्यक्तिचित्र बिघडू दिले नाही. आणखी काही प्रयोगानंतर त्यांच्या कामातील रंग अधिक गहिरे होतील. त्यांचे आनंदीबाईचे काम पाहणे हा आनंदाचा भाग ठरेल! मा. दत्ताराम यांनी आपल्या नेहमीच्या चढ्या आणि चिरचिरीत आवाजात रामशास्त्री उभा केला. रामशास्त्र्याचे वागण्यातले–बोलण्यातले–निर्णयातले तेजस्वीपण तितक्या ताकदीने उभे राहिले नाही. मामा पेंडसे नाना फडणवीस होते. त्यांना या नाटकात फारच थोडी कामगिरी होती ती त्यांनी चोख बजावली. दुय्यम पात्रांपैकी विशेष लक्षात राहिले ते म्हणजे नाना ओक आणि दिलीप कोल्हटकर.

हा प्रयोग न रंगण्याचे, कंटाळवाणा होण्याचे आणखी एक कारण म्हणजे दिग्दर्शनातील विस्कळीतपणा. हा प्रयोग बांधीव स्वरूपात सादर झाला नाही. प्रत्येक पात्राचे परस्परांना क्रियाप्रतिक्रियात्मक वागणे-बोलणे इत्यादी सारे व्यवहार रंगभूमीवर असावे लागतात, त्यामुळे जो एकसंध आकृतीबंध तयार होतो, तसा निर्माण करण्यात दिग्दर्शकांना यश लाभले नाही. परिणामी ज्या अपेक्षेने, उत्साहाने प्रयोग पाहण्यास प्रेक्षक आला, त्याच्या पदरी फारसे आनंदाचे क्षण आले नाहीत; अखेरीस नानासाहेब फाटक, दुर्गाबाई यांनी केलेल्या प्रयोगाच्या आठवणींची सोबत शिल्लक राहिली!

## जमून गेलेला सवाई माधवराव

'भाऊबंदकी'नंतर आठच दिवसांनी 'सवाई माधवराव यांचा मृत्यु' या नाटकाचा प्रयोग पाहण्याचा योग आला. भाऊबंदकीचा अनुभव जमेस धरून, या नाटकाबद्दल कितपत अपेक्षा कराव्यात अशी शंका मनाला अस्वस्थ करीत होती. कारण भाऊबंदकीच्या मानाने या नाटकाची रंगत लेखनदृष्ट्या कमी आहे. भाऊबंदकीतील नाट्यमयता, प्रभावी व्यक्तिरेखा, परिणामकारक भाषा जर आपण पाहिली तर 'सवाई माधवराव'मधील लेखनाचा सैलपणा, विरविरीतपणा सहज जाणवण्यासारखा आहे. कंटाळवाणी निवेदने, स्वगते, इतिहास घटनांसंबंधीच्या चर्चा इत्यादी गोष्टींमुळे नाटक म्हणून रचनेच्या दृष्टीने अनेक उणीवा त्यात आढळतात. नाटककाराच्या लेखन उमेदीतले पहिले-वहिलेपण सहज उमगून येते.

पण ही सारी कसर प्रयोगाने भरून काढली. आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो सवाई माधवरावचे काम करणाऱ्या स्नेहलदत्त या कलाकाराचा! कॉलेजच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेला हा



स्नेहलदत्त, सुहास म्हात्रे । सवाई माधवरावाचा मृत्यू

स्नेहलदत्त (गजानन गोखले) आपल्याला रंगभूमीवर जसा नवा आहे, तशीच त्यालाही रंगभूमी नवीच आहे. त्याचे हे पहिलेच काम. मोठ्या ताकदीने त्याने पेलले. पहिल्या एक-दोन प्रवेशात त्याला आवाजाचा सूर सापडेना, नवखेपणा जाणवण्याइतपत तो सावधपणाने बोलत होता. पण दुसऱ्या अंकाच्या अखेरच्या स्वगतापासून त्याने उत्तम आवाज लावला. माधवरावाच्या व्यक्तिरेखेतील निरनिराळ्या छटा अभिनयाने सिद्ध केल्या. त्याचे काम परिपूर्ण होते, असे मुळीच नाही. पण व्यावसायिक रंगभूमीवर इतकी मोठी भूमिका इतक्या तोलाने पेलणे हे निःसंशय कौतुकाचे आहे. हे कौतुक किंवा हा पुरस्कार त्याच्या भविष्यकालीन कामगिरीला आवाहनात्मक ठरावा, याच हेतूने अधिक प्रमाणात केला आहे. यशोदेच्या भूमिकेत माधवरावाला आपल्या अभिनयाने सुहास म्हात्रे यांनी उत्तम साथ दिली. यात केशवशास्त्री झाले होते मा. दत्ताराम. काही वर्षांपूर्वी दत्तारामबापूंनी याच नाटकात सवाई माधवरावाची


स्मरणीय भूमिका केली होती. त्यावेळी केशवशास्त्री होते केशवराव दाते. हा प्रयोग पाहताना–विशेषत: दत्ताराम-बापूंचे केशवशास्त्र्यांचे काम पाहून केशवरावांची याद तर येत होतीच. पण बापूंनी आपल्या भूमिकेत कोणतेही उणेपण येऊ दिले नाही. योग्य त्या ठिकाणी आपल्या चढ्या आवाजाला मुरड घालून केशवशास्त्र्यांचे धूर्तपण, कारस्थानीपण प्रभावीपणे व्यक्त केले. याही नाटकात नाना फडणवीस होते मामा पेंडसे ! मामा पेंडसे म्हणजे नाना फडणवीस हे मराठी रंगभूमीवरचे समीकरण आहे. दिसण्यात–बोलण्यात–वागण्यात आणि अभिनयात इतक्या हुबेहुब पद्धतीने वावरणारा नाना फडणवीस विद्यमान रंगभूमीत तरी अन्य कोणी नाही. (नाटक पाहताना गमतीने एकदा वाटून गेले की एखादे वेळी इतिहासातील खरेखुरे नाना जर पुन्हा अवतरले तर त्यांना मामांसारखेच बोलावे लागेल, वागावे लागेल !) दुय्यम पात्रांपैकी लक्षात राहिले म्हणजे पाटलाचे काम करणारे अनंत वर्तक आणि आईच्या भूमिकेतील रजनी जोशी !

हा प्रयोग जमून गेला याचे मुख्य कारण यातील संघभावना (टीमवर्क)! दिग्दर्शक होते मामा पेंडसे. मामांनी हा प्रयोग घोटीव पद्धतीने बसवूनही तो यांत्रिक किंवा एकसुरी होऊ दिला नाही. दुसरे म्हणजे ऐतिहासिक नाटकाचा बाज कायम राखून तो कोठेही भडक केला नाही. सर्व प्रवेश, अंक आखीव–रेखीव–बांधीव होते. संघ-भावनेमुळे प्रयोगाला पर्यायाने अभि-नयाला एक संयतरूप लाभले होते. त्यामुळे कोणा एकाचेच काम मोठ्या उंचीवर जाऊन प्रयोगाची घसरण झाली नाही. उत्तम दिग्दर्शनामुळे तर हा प्रयोग लक्षात राहीलच, पण दत्ताराम-बापूंकडून वेगळे काम करवून घेतल्या-बद्दल आणि स्नेहलदत्त हा एक नवा नट रंगभूमीला दिल्याबद्दल अधिक ध्यानात राहील.

'भाऊबंदकी' आणि 'सवाई माधवराव' या दोन्ही नाटकांचे नेपथ्य, प्रकाश आणि इतर तंत्र पूर्णत: समाधान देणारे होते. सामान्यत: रुळाच्या पडद्यावरचे नाटक सध्याच्या दिवसात पाहणे नको वाटते. पण साहित्यसंघाने एकतर सर्व पडदे, नेपथ्यातील इतर साहित्य नवे करवून घेतले होते. ते पाहून पेशवाईचे खरे वैभव जाणवत होते. रुळाच्या पडद्यांनी नाटकाच्या रंगतीत कोणताच व्यत्यय आणला नाही. हे दोन्ही प्रयोग पुनर्जीवित केल्याबद्दल संघाचे पांगे, अमोणकर आणि सारे कलाकार यांचे मराठी प्रेक्षकाने ऋण मानावे इतकी ही महत्त्वाची घटना आहे. कारण खाडिलकरांची जन्म-शताब्दी साजरी झाली ती खऱ्या याच प्रयोगांनी. नाटककाराचे आणखी जिवंत स्मारक ते कोणते ? ◻ ◻ ◻

# केवळ तुमच्या आठवणीसाठी

(थोडेसे हितगुज)



आमच्या केंद्राला भेट देऊन तेथील डॉक्टरांशी विचारविनिमय करण्याची कदाचित तुमची इच्छा असेल. हें केवळ आपल्याला आठवण करून देण्यासाठीं. तुमचें स्वागतच होईल.

कांही बाबतींत तुम्हाला माहिती हवी असेल, शंकांचे निरसन करून घ्यायचें असेल, एखादी बाब निष्कारण सतावत असेल आणि या सगळ्यामुळे तुम्ही फारफार मागेपुढेहि करीत असाल, कांहीहि असो, डॉक्टरांशी सल्लामसलत केल्याने मार्ग निश्चितच सापडेल.

तुम्ही वाचलेलें साहित्य पुरेसें नसावें सगळ्याच गोष्टींची चर्चा छापील स्वरूपात पुरी मांडता येत नाही. वैयक्तिक प्रश्न तर नाहीतच नाही.

आजच कुटुंब कल्याण नियोजन केंद्राला भेट द्या

davp 72/458

# विकली जाणारी भारतीय माणसे : एक प्रतिक्रिया

चंद्रशेखर मराठे

सौ. पुष्पा भावे यांचे वरील शीर्षकाखाली आलेले विचार वाचले. त्यांची काही विधाने व मला (राजकीय आर्थिक विषयांचा एक अभ्यासक म्हणून) आलेल्या शंका खाली देत आहे. सौ. भावे यांनी वा अन्य कोणी त्यांचा खुलासा करावा अशी नम्र अपेक्षा आहे.

**अन्न-वस्त्र-निवारा म्हणजे सुख ही तर पशु कल्पना.**

–अन्न वस्त्र निवारा हे पशुपातळीवरील सुख तरी भारतात किती जणांना मिळते ? नियोजन मंडळ व उद्योग-व्यापार संघटना या दोहोंच्या ताज्या पाहणीनुसार भारतात सुमारे चाळीस टक्के जनता निर्वाहपातळीखाली आहे. तिचे दरडोई उत्पन्न महिना ३७॥ रु.च्या किती तरी खाली आहे.

या गोष्टीची जाणीव किती विचारवंत, कलावंत, लेखक वगैरे आविष्कारादी वर्गात आहे ? ही जाणीव किती कलाकृति वा कलात्मक अनुभूतीतून व्यक्त होते ? किती प्रमाणात ? कलावंत आज जे प्रश्न हाताळतात ते समाजाचे प्रातिनिधिक प्रश्न आहेत असे म्हणता येईल काय ?

आधी पशुपातळीवरील सुख व मग मानवी पातळीवरील व दैवी पातळीवरील सुख हा क्रम सामाजिक मानसशास्त्रात मान्य केला आहे. समाजातील मोठ्या वर्गास पशुपातळीपासूनही वंचित ठेवून आपण दैवी सुखाच्या मागे लागावे काय ? याने समाज म्हणून जी एकसंध बांधीलकी असावी लागते ती साधेल काय ?

**भारत गरीब आहे, बेशिस्त आहे परंतु तो तसा आहे हे म्हणण्याचे स्वातंत्र्य आम्हाला आहे आणि ते महत्त्वाचे आहे.**

–आम्हाला म्हणजे कोणास ? प्रत्यक्ष कृति न करता केवळ भाष्य करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे मानणाऱ्या मध्यम वर्गास ? भाष्य करण्याच्या विविध तऱ्हा (म्हणजेच आविष्कार स्वातंत्र्य) या भाष्य विषयापेक्षा महत्त्वाच्या आहेत असे मानण्यात मध्यम वर्ग चूक करीत नाही काय ? भारत गरीब व बेशिस्त (वा आणखी काही) आहे असे लाख वेळा स्वतंत्रपणे म्हटल्याने काय साध्य होणार ? हे तरी आज पहिल्या दर्जाचे कलावंत म्हणत आहेत काय ? गतेतिहासाचे उदात्तीकरण (रणजित देसाई) अपवादात्मक विकृतीचे चित्रण (विजय तेंडुलकर) मध्यमवर्गाची भलावण (पु. ल. देशपांडे) अशा निरुपद्रवी व निष्प्राण कामात आम्ही आमचे विचार-स्वातंत्र्य वापरीत आहेत. या विचार-स्वातंत्र्यातून आम्ही नवा इतिहास घडवणार आहोत काय ?

विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य यात गल्लत होत आहे काय? विचार हा काही अभ्यास व हेतू गृहित धरतो तर मतांचे तसे नसते. मते ही मोघम, ढोबळ व जुजबी असतात.

खरे विचारस्वातंत्र्य ज्ञानाच्या अखंड साधनेतून येते. ज्ञानाच्या वाढीशिवाय विचार खऱ्या अर्थाने 'स्वतंत्र' होऊ शकत नाही. आज किती सर्जनशील भारतीय निखळ ज्ञानाच्या वाटा चोखाळतात?

भारतात विचारस्वातंत्र्य आहे असे वादासाठी गृहित धरले तरी या स्वातंत्र्याचा उपयोग कसा होत आहे? पत्रकार, विचारवंत, लेखक, अभ्यासक हे समाजाचे खरे प्रश्न, खरी दुखणी चिकाटीने, अभ्यासाने जाणून ती लोकांसमोर मांडतात काय?

भारतीय पत्रकारिता मतप्रधान (ओपिनियोनेटेड) आहे तर कलासृष्टी ही परपुष्ट व सवंग आहे. आविष्कार-स्वातंत्र्यासाठी कोर्टात धाव घेणारे लेखक 'स्वतंत्र'पणे किती व कोणती निर्मिती करतात? कोणाचे, स्टेजवर लुगडे नेसताना दाखवणे, या हक्कावाचून अडले आहे? आमचे भौतिक जीवन पशुपातळीखाली आहे म्हणून वैचारिक जीवनही तेथपर्यंत जावे काय?

ज्या स्वातंत्र्याचा उपयोग करण्याची येथे इच्छा, कुवत वा शक्यता नाही त्या स्वातंत्र्याचा अभिमान कशासाठी? कोणासाठी?

**अर्थात बंधन, जबरदस्ती हा भारताचा मार्ग नाही.**

—हे म्हटल्यावर पुढल्याच वाक्यात सौ. भावे असे सुचवितात, की सामाजिक असहिष्णुता (म्हणजे सुप्त जबरदस्तीची) इतकी वाढवावी की काही गोष्टी माणसे करताना आपोआप कचरतील. रशिया तरी वेगळे काय करत आहे? तेथे प्रत्येक माणसाला जी सामाजिक बंधने पाळावी लागतात त्यांचे स्वरूप केवळ हिंसात्मक आहे काय? कोणतीही समाजरचना केवळ हिंसेवर ५० वर्षांवर अधिक काळ टिकू शकणार नाही. भारतात जबरदस्ती-बंधन नाही हे तरी खरे काय?

कोणीही सध्याच्या प्रस्थापितांविरुद्ध खरेखुरे, सातत्याने बोलून दाखवावे आणि येथील स्वातंत्र्याची प्रचीती पहावी. जोपर्यंत येथील विचारवंत-कलावंत गैरलागू बाबींवर लक्ष केंद्रित करीत आहेत तोवरच त्यांना येथे स्वातंत्र्य आहे. कारण त्या स्वातंत्र्याचा येथील समाजरचनेवर काही परिणाम होणारा नाही. येथल्या बंडखोरांचे धैर्य-धाडस केवळ बेडरूमपुरते मर्यादित नाही काय?

**हिप्पी हा संपन्न देशाचा प्रश्न आहे.**

—अमेरिका संपन्न असेल पण तेथे सापेक्ष विषमता आहेच. स्पर्धेचा अतिरेक व त्यातील सामाजिक ताण यातून हिप्पी (सोशल ड्रॉप आऊट्स) निर्माण होतात. संपन्नता म्हणजे किमान समानता नव्हे. 'रशियात ही किमान समानता (पशुपातळी म्हणा हवे तर) आहे म्हणून तेथे मानसिक रोगांचे व शरीर-भावनिक विकृतींचे प्रमाण कमी आहे' असे डॉ. जे. ए. सी. ब्राऊन त्यांच्या 'सोशल सायकॉलॉजी ऑफ इंडस्ट्री' या ग्रंथात नमूद करतात. हिप्पींचा मानसिक प्रश्न स्वातंत्र्य नाकारले जाते

हा नसून अपेक्षा व अर्जन यातील अंतराचा आहे व तो स्पर्धात्मक समाजरचनेतूनच उद्‌भवतो. रशियात हिप्पी निर्माण होत नाहीत कारण तेथे सापेक्ष विषमतेतून येणारे ताण कमी आहेत.

**आम्हाला जे काही हवे आहे ते या भूमीवर, विचारस्वातंत्र्याचे मुक्त वारे असणाऱ्या या लोकशाहीत हवे आहे.**

—एकीकडे या भूमीत विचारस्वातंत्र्याचे मुक्त वारे वाहतात असे म्हणायचे व दुसरीकडे इतर भूमीमधील विचारांना मज्जाव करायचा हा कोणता प्रकार ? विचारांना भूमीची मर्यादा नसते. ते देशाभिमान ओळखीत नाहीत. देशाभिमानाच्या उर्मीतून विचार निर्माण होत नाहीत तर भावना निर्माण होतात. त्यांनाच विचार (थॉट) मानण्याची चूक आम्ही सतत करीत राहणार काय ? भूमी, मातृभूमी, देश या भावना आवश्यक आहेत पण विचारांच्या राज्यात त्यांना उच्चासन नाही. मार्क्स, रूसो, गांधी, बर्क, केन्स हे सर्व जगाचे विचारवंत आहेत. एका भूमीचे नाहीत. भूमीवादातून सच्चा विचार जन्म पावत नाही. जे आमचे तेच आम्हाला हवे असे म्हणणे म्हणजे निष्ठा की काय ? यात विचाराचे कोणते स्वातंत्र्य, आवाका, पल्ला, ताजेपण शिल्लक राहतात ?

हे आमचे म्हणणेसुद्धा जनसामान्याचे नव्हे, पशुपातळीवर जीवन जगणाऱ्यांचे नव्हे तर साहित्य संघमंदिरात काव्य, शास्त्र, विनोद करणारांचे !

एवढ्या शंका पुरे झाल्या. सौ. भावे यांच्या विचारात देशाभिमान व विचारस्वातंत्र्य यांची एक खास मध्यमवर्गीय 'मक्तेदारी' दिसली म्हणून हा प्रपंच केला. एरवी 'राजकारण हा माझा प्रांत नाही' हा आगाऊच बचाव त्यांनी केलाच आहे.

एक राष्ट्र—एक समाज असे रात्रंदिवस घोकून काहीच साध्य होणार नाही. पशुपातळीहून खालच्यांना या गोष्टी समजणार नाहीत. त्यांना राष्ट्र—समाज—स्वातंत्र्य भेटवावे लागेल ते भाकरीच्या रूपाने. ते न जमल्यास काय ? समाजातील प्रत्येकाचे प्रत्येकाशी काही नाते आहे एवढेतरी वाटण्याजोगी व्यावहारिक समानता आणणे !

आपल्या 'द् ब्लीक एज' या पुस्तकात जे. एल. व बार्बारा हॅमंड म्हणतात—"समाजाबद्दल स्त्रीपुरुषांना ओढ वाटावयाची असेल तर त्यात आपल्याला स्थान आहे असे त्यांना वाटले पाहिजे. त्यांना असे जग सापडले पाहिजे की ज्यामध्ये सामुहिक मनास कोणत्या तरी प्रमाणात, कोणत्या तरी मार्गाने वाव, शांतता, समाधान व स्वत्त्व यांचा लाभ होईल."

वर दोन्ही अवतरणे पाश्चात्यांची आहेत यालाही सौ. भावे कदाचित मानसिक गुलामगिरी म्हणतील. पण करणार काय ? सामाजिक संबंध व समाजरचना यावर एतद्देशीय विचारवंत—कलावंत यांनी काही मूलगामी भाष्यच केलेले नाही—त्यांना रशियापेक्षा कितीतरी अधिक विचारस्वातंत्र्य असूनही !

ज्याच्या आधारावर विचारस्वातंत्र्य उभे आहे त्या 'सोशल कॉन्शन्स'पासून पूर्णपणे फारकत घेऊन आमचे तथाकथित विचारस्वातंत्र्य तरी आम्ही फार काळ उपभोगू शकू काय ? ◻ ◻

# कोण धरणार काळाचे मनगट !

## निळू दामले

शांतता ! दुष्काळ चालू आहे !!

मोर्चे काढू नका, निदर्शने करू नका. विरोध करू नका. लोकांना खायला मिळाले नाही तरी काळजी करू नका, प्यायचे पाणी मिळणार नसले तरी चिंता करू नका, दुष्काळी कामावर लाचलुचपत होत असली तरी लक्ष देऊ नका. सर्व गोष्टींची काळजी घेतली जाणार आहे. (ईश्वर मृतात्म्यांना शांती देईल !)

सोलापूर जिल्ह्यात दिवसाला ५०० पेक्षा जनावारे मरताहेत. कुर्ल्याच्या प्लॅटफॉर्मवर दुष्काळी भागातल्या लोकांची वसाहत निर्माण झाली आहे ! नाशिक जिल्ह्यात दुष्काळ तीव्र झाला आहे. सगळे तालुके दुष्काळात सापडले आहेत. नगर जिल्ह्यात भीषण अवस्था व स्थलांतराला सुरुवात. उत्तम जातीच्या बैलाची उस्मानाबाद जिल्ह्यात माती-मोलाने विक्री. एका केळयाच्या घडाच्या किमतीत गाय विकल्याचा एक किस्सा. बीड-परभणीकडे १। ते १।। रुपयाला कडब्याची पेंढी घ्यावी लागते. पाणी नाही. विद्यार्थ्यांच्या परीक्षा अलिकडे आणाव्या लागल्या. त्यांचे शिक्षणच बंद पडण्याची पाळी आली आहे. रत्नागिरी-ठाणे जिल्ह्यातले लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याची तक्रार करताहेत. औरंगाबाद, सिन्नर, नासिक सारख्या शहरात काविळीचे थैमान. महाराष्ट्रभर दुष्काळ हा असा धुमाकूळ घालतो आहे.

सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाचे हे लागोपाठ ५ वे वर्ष आहे, उस्मानाबाद जिल्ह्यात तिसऱ्या वर्षी पुन्हा निसर्गाने क्रूर तडाखा दिला आहे. नगरचीही तिच अवस्था.

विदर्भ, मराठवाडा, नगर व सोलापूर असे महाराष्ट्रातल्या २६ जिल्ह्यापैकी किमान १५ जिल्हे कायम निसर्गाच्या प्रकोपाचे बळी होत असतात.

वृत्तपत्रातून बातम्या आणि छाया-चित्र आता रोजच प्रसिद्ध होत असतात. यशवंतरावराजे चव्हाण यांनी घोषणा केली की महाराष्ट्रात कोणालाही उपाशी मरू दिले जाणार नाही. (आम्हाला मरायचे आहे असे सांगणाऱ्यांची रांगच लागली असावी चव्हाणांसमोर ! त्यांना दम देऊन 'मरू देणार नाही' असे ठणकावून सांगताहेत असा तर प्रकार नाही ना ?) म्हणजे माणसे मरण्याची पाळी आली आहे किंवा मरत आहेत हे नक्की. चव्हाणांचे शिक्कामोर्तब म्हणजे

दुष्काळ नक्कीच झाला!! हा झाला दुष्काळ...पण कालपर्यंतची ही परिस्थिती.

आज आता परिस्थिती पुन्हा स्थिर-स्थावर झाली आहे. मर्तिकाचे सामान विकणारा दुकानदार जितक्या निर्विकारपणे 'मयता'च्या आकाराविषयी चौकशीवरून थंडपणे बांबू किती व कुठले लागतील हे सांगतो, स्वस्त कुठली झापे वा मडकी हेही सांगतो तितक्याच निर्विकारपणे लोक आता दुष्काळाकडे पाहू लागले आहेत. दुष्काळातले थ्रिलचं आता नाहीसे झाले आहे, दुष्काळात आता गंमतच राहिली नाही.

कारण मध्यंतरी येऊन गेली दिवाळी. मुंबई सारख्या शहरात ५० लाखाच्या फटाक्यांचा धूर झाला. आणखी लाखोंची मिठाई पचवली गेली. सोन्याचीही खरेदी पूर्ण इतमामाने झाली. इंदिरा रानी मुंबईत येऊन गेल्या आणि पूर्ण बंदोबस्तात थाटमाट उरकले गेले. एका शाळेच्या उद्घाटनावर मंत्र्यांच्या उपस्थितीत हजारो रुपये उधळले गेले. इंदिरा रानीचा एक मोठा पुतळाही त्या शाळेत तयार करून ठेवला होता. अजूनही आहे.

लग्नसमारंभ व्यवस्थित चालले होते. शिवाजीपार्क जवळ, टर्फ क्लबचा व अन्य ठिकाणी पूर्ण रोषणाई सकट मेजवान्या झोडल्या जात होत्या, आहेत. वृत्तपत्रातून आपल्या लेखामधून चिंता प्रकट करणारे लोकही ह्या समारंभात हजेरी लावत असत. सर्व काही आलबेल होते.

दुष्काळ चालूच होता.

आता निवारण योजना पुढे येताहेत. सरकारच्या प्रयत्नांना यश येवो आणि गोरगरिबांचे होणारे हाल एकदाचे थांबोत. पण असल्या सदिच्छांनी प्रश्न सुटत नसतात.

म्हाताऱ्या मरत आल्या. काळही सोकावला. पण काळाचा हात धरण्याचा विचार मात्र झाला नाही. माझ्यासारख्या सामान्य माणसाला म्हातारीच्या मृत्यूचे जेव्हढे वाईट वाटते तेव्हढेच किंवा त्याहिपेक्षा खंत आहे, काळाचे हात हासडू न शकणाऱ्या हतबल, गोंधळलेल्या आणि पौरुष गमावून बसलेल्या आमचीच.

आग विझवायची गडबड सुरू झाल्यावर विहीर खणायची जबाबदारी कोणावर होती हे विसरले जाते. आणि तो चोर नेहमीच ह्यातून सहीसलामत सुटून मजा मारत राहतो.

मुंबईत, युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दुष्काळग्रस्तांपेक्षाही बापुडवाणे चेहरे करून, दुष्काळग्रस्तांसाठी झोळ्या फिरवल्या. 'सहाय्य करा'ची हाक देणारी पोस्टर्स लावून त्यांनी आपली असहाय्यता रस्त्यावरच जाहीर केली.

ते बिचारे खरोखरच असहाय्य आहेत. त्यांच्या राजकीय आई, बाप, मामा, काका वगैरे सर्वांना ह्या देशात कायम बहुमत मिळेल. कायदा त्यांच्या हातात दिला होता. पैसाही होता. चार वेळा निवडणूकीत जिंकून त्या सर्व मतांच्या बेरजेपेक्षा जास्त मते गेल्या निवडणुकीत ह्यांना दिली गेली. इतकी

मते की उस्मानाबादचे खासदार-आमदार तर चक्करलेच होते. असे असूनही त्या सर्वांना काहीच करता आले नाही. मग ह्या तरुणांचे आणखी काय होणार. (निसर्ग आणि नोकरशाहीच्या नकारामुळे हे झाले ! आम्ही काय करणार अशी बाळबोध उत्तरे वसंतराव, यशवंतराव देतात ! )

त्या बिचाऱ्यांच्या करुणाजनक परिस्थितीला आणखीही एक कारण आहे. त्यांच्या परमपूज्य माताजी इंदीरांजींनीच केवळ समाजवादाची घोषण केल्यामुळे ते संकटात आलेले नाहीत. माताजींच्या पिताजींनी 'सोशलिस्टीक पॅटर्न ऑफ सोसायटीची' घोषणा अनेक वर्षांपूर्वी केली होती त्यांनाही प्रचंड मताधिक्य मिळाले होते. अशी ही समाजवादी परंपरा फार वर्षापूर्वी पासूनची आहे. आता आई-आजोबांना न जमल्यास नातवांना कसे जमावे. नेहरूजींनी गरीबीची निर्मिती केली असली पाहिजे. नाहीतर ती हटवायची घोषणा इंदीराजींना करण्याची जरूरीच पडण्याचे कारण नव्हते. असे वेडेवाकडे प्रश्न ह्या युवकांना सतावू लागले आहेत.

महाराष्ट्रातही यशवंतरावांचेच राज्य गेली कित्येकवर्षे चालू आहे. वसंतराव स्वतःच्या बुद्धीने राज्य चालवत नाहीत असे मला म्हणावयाचे नाही. पण वसंतरावच म्हणतात की आम्ही यशवंतरावांच्या नेतृत्वानुसारच राज्य कारभार करतो. म्हणजेच एकाच माणसाचे राज्य इतकीवर्षे चालले आहे असे म्हणावयास हरकत नाही. आता अशी प्रति छत्रपतींची कारकीर्द होऊनही अनेक जिल्हे कायम दुष्काळी राहू लागले.

मग नेमके झाले तरी काय ? हरित क्रांती, सुबत्ता झाली. ती गेली तरी कुठे? हजारो करोडो रुपयांचा हिशोब लावायचा तरी कसा ? ह्या प्रश्नापर्यंत सामान्य माणूस येतो. पण इथेच गोंधळतो. मूग गिळून गप्प बसतो.

एका बाजूला दुर्दैवी जिल्ह्यांत दुष्काळ पडतच राहिले आणि दुसऱ्या बाजूला करोडो रुपये खर्चाचा टेलिव्हीजन येतच राहिला. शिक्षण होणार म्हणे टेलिव्हीजनने. कोणाचे ? ५ हजार रुपये उडवू शकणाऱ्या भरल्या पोटाची ढेकर देणाऱ्या मुंबईतल्या लोकांचेच ना ? त्याच मुंबईत ७ लाख लोक अमानुष वस्तुस्थितीच्या पंगतीत असतात ना ? ह्या राज्यातल्या दुष्काळाने सतत संत्रस्त राहणारे, छोटे शेतकरी, झोपडपट्टीतले लोक ह्यांना जीवन देणे महत्त्वाचे का मुंबईपुण्यातल्या मूठभरांच्या डोळ्यांच्या मस्तीला खाद्य पुरवणे महत्वाचे ? समाजात चांगल्या अवस्थेत असलेल्यांचीच धन होत राहिली. टी. व्ही. त्यांच्यासाठीच आणि जुळी मुंबईही त्यांच्यासाठीच. असे पैसे खर्च होत राहिल्यावर दुष्काळावर तोडगा सापडणार कसा. तरीही निर्लज्जपणे टी. व्ही. च्या उद्घाटनाचे तमाशे झाले. मंत्र्यांनी प्रदर्शने केली. वृत्तपत्रांनी वारेमाप प्रसिद्धी दिली. त्या दोन तीन दिवसात महाराष्ट्रात आता एकदम सुवर्णयुगच झाले की काय असे वाटावे इतक्या ताशे वाजंत्र्या मुंबईच्या वृत्तपत्रातून वाजत

होत्या. (आता पुण्यातले लोक त्या सुखात नहायला सिद्ध झाले आहेत)

हरित क्रांतीची किमया झाली द्राक्षांच्या वेलावर, उसाच्या रानात. ज्वारी नेहमीच करपून जात राहिली. हा अनुभव सामान्य माणसाचा. हिशोबात तोटा झाल्याचे दाखवून वर्षानुवर्षे इंपालातून उतरणारे शेठ नेहमी पहायला मिळतात. मंत्री काय वेगळे असणार? त्यांच्या आकडेवारीवर विश्वास ठेवणे सामान्य माणसाला जडच जाते. कारण त्या शेठ प्रमाणेच कठीण आर्थिक परिस्थितीची जाणीव हे मंत्री नेहमीच करून देतात, दुष्काळाबद्दल कळवून बोलतात पण (कायदा सांभाळून) पेट्रोल पंप मात्र न विसरता खरेदी करतात. ह्या पंपांच्या साहेबांची काळजी घेणे हा एक वेगळा धंदाच आम्हाला करावा लागतो असे इंडियन ऑईलचे अधिकारी (हळूच आसपास कोणी नाही ना हे पाहून!) सांगतात. विकासाच्या आकडेवाऱ्यावर कसा विश्वास बसावा?

सत्तेतल्या भागीदारांची सारखी वाढत जाणारी संपत्ती, काही भागात सतत पडणारा दुष्काळ त्यांचा परंपरागत मागासलेपणा, अनावश्यक बावीवरचा खर्च ही चित्रे एकाला एक जोडल्यावर काय अर्थ त्यातून निघतो?

दुष्काळाची अवदा इथे संपत नाही. खरी सुरवात ह्या पुढेच आहे. जनावरे गेल्यावर, पुढल्या वर्षी इतर सर्व साधने उपलब्ध होऊनही, यशवंतराव म्हणतात तसा पाऊस पडूनही, शेत नांगरायचे कसे हा प्रश्न शेतकऱ्यापुढे उभा राहणार आहे. गेल्या रब्बीचे धान्याचे साठे असतानाच आता भाववाढ झाली आहे हे साठे संपल्यावर आणि पुढल्या पिकाला बराच वेळ असताना भाववाढ ह्यापेक्षा भयानक प्रमाणावर होणार आहे.

दुसऱ्या बाजूला औद्योगिक विभागात पाणी व विजेची टंचाई आणखीनच प्रश्न वाढवणार आहे. औद्योगिक मालाचे भाव त्यातून वाढणार आहेत. दोन्ही क्षेत्रात-उद्योग व शेती-उत्पादन कमी होण्याने भांडवल संचय होणार नाही. म्हणजे भाववाढ, भांडवलाची कमतरता आणि लोकांना जगवण्यासाठी दुष्काळावर झालेला बराचसा अनुत्पादक किंवा फार काळाने उत्पादन देईन असा पैसा ह्यामुळे 'इनफ्लेशन'सारखे प्रश्न पुढल्या वर्षी उभे राहणार आहेत. झाले आहे हे काहीच नाही अशा संकटांचा सामना करावा लागणार आहे.

बराच काळ दुर्लक्ष केलेला रोग नेहमीच भीषण स्वरूप धारण करत असतो.

असा हा दुष्काळ. दूरवर रुतलेल्या पाळामुळांचा.

कोण आहे जबाबदार?

दुष्काळावर उतार म्हणून आता एखादा यज्ञ शासनाने करावा! एवढेच आता फक्त बाकी राहिले आहे. कारण ह्यांच्या हातात दिलेल्या कायद्याने संरक्षण झाले फक्त कॅनॉलचे पाणी चोरून गबर झालेल्या लक्षभोजनी बागायतदारांचे. अप्रत्यक्ष करांच्या

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH–649

रूपाने प्रचंड प्रमाणावर ह्यांच्याकडे दिलेल्या पैशाने चांदी केली मोठमोठ्या शेठ लोकांनी; सत्ताधीशांच्या सग्यासोयऱ्यांच्या पुनर्वसनासाठी हा सामान्य माणसाचा पैसा खर्च झाला. ह्यांना दिलेल्या अधिकाराचे छत्र लाभले भाऊसाहेब बार्शीकरांना. सामान्य माणसांचे घर कायम उन्हातच !

अर्थशास्त्राच्या जाणकारांनी कधीच ह्यातूनच मार्ग काढण्याचा जोरकस प्रयत्न केला नाही. आपल्या पोटापाण्याची काळजी घेत आपापल्या प्राध्यापक्या सांभाळण्यात त्यांनी धन्यता मानली. वृत्तपत्रांनीही टिळकांचे नाव घेण्यापलीकडे विशेष काही केले नाही. माझ्या माहितीतले एक संपादक तर अभिमानाने सांगतात की ते नोकर आहेत. ×××साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपण वागतो. त्यामुळे ज्यावेळी शासनाला दुष्काळाच्या बातम्या बाहेर येणे सोयीचे नसते त्यावेळी कटाक्षाने दुष्काळाचा मागमूसही त्यांच्या वृत्तपत्रांतून राहत नाही आणि ज्यावेळी केंद्राकडून पैसे मिळवण्याची आवश्यकता भासते शासनाला, त्यावेळी वृत्तपत्र जनावरांच्या सापळ्याचे फोटो छापू लागतात, हाहाकाराची रसभरित वर्णने देऊ लागतात. दुष्काळाला दुष्काळ म्हणून किमतच नाही, दुष्काळ ठरतो शासनाच्या सोयीनुसार. साहित्यिक तर वसत स्तोत्रे, यशवंत काव्ये करण्यात गुंतलेले. जुळ्या मुंबईची पत्रके काढण्यात साहित्यिक इतिकर्तव्यता मानू लागलेले. पत्रकारांबरोबरच त्यांनासुद्धा ओढ लागलेली स्वस्तात मिळणाऱ्या वांद्र्याच्या कलानगरातल्या जागेची. त्यामुळे पोटतिडीकीने सामान्य माणसाची सुखदु:खे समाजासमोर ठेवायला त्यांना वेळच मिळत नाही. हे सगळेच बुद्धिवंत! त्यातूनही जे उरतात ते विचारे गोंधळलेत किंवा त्यांचीही घोंगडी कुठे कुठे अडकून पडली आहेत.

चुकीचे नियोजन, स्वार्थी वृत्ती, आंधळी वाटचाल अशी दुष्काळाची कारणे दुर्लक्षिली जातात; जाणार आहेत. बुचकळ्यात पडलेला सामान्य माणूस पुन्हा अयोग्य निर्णय घेणार आहे. दुष्काळ पडतच राहणार आहे. माणसे रडतच राहणार आहेत.

कोण धरणार काळाचे मनगट ?

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण,१०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर